# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९९ |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०

## गणपत्रिका क्रमांक : २९

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष चौथे / अंक २/ ऑगस्ट १९९९

## संपादकीय

### प्राथमिक शिक्षण

लहान शिशूत प्रवेश घेतलेले मूल थोडे अंक, थोडीशी अक्षर ओळख व निवडक शिशुगीत पाठ करीत मोठ्या शिशूत जाते. आता ते थोडेफार धीट होते व शाळेत रमू लागते. मोठ्या शिशूत आणखी थोड्या अभ्यासाबरोबरच ते शाळेतील लहान लहान स्वरूपात साजऱ्या होणाऱ्या आषाढी एकादशी, नागपंचमी, कृष्णजन्म, दहीकाला, गौरी, गणपती, नवरात्र, दसरा, दिवाळी वगैरे भारतीय सणांच्यात भाग घेऊ लागते. तर काही इंग्रजी शाळांतून या सणाबरोबरच मदर्स डे, ख्रिसमस, नववर्ष वगैरे सणांची माहिती त्याला होते.

पहिल्या दोन वर्षानंतर मूल जेव्हा पहिलीत म्हणजे प्राथमिक शाळेत येते तेव्हा त्याचे वय ५ वर्षे पुरे असले पाहिजे असा सरकारी नियम आहे. मग अशावेळी घाईने शिशुवर्गात घातलेल्या मुलांना एक वर्ष जास्त मोठ्या शिशूत नाराजीने काढावे लागते. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्याच्या शिशू प्रवेशासाठी घाई करू नये. अथवा लवकर शाळेत टाकलेच तर मग एक वर्ष थांबवण्याची त्यांची तयारी पाहिजे. खरे तर मानसशास्त्रीय दृष्ट्या मुलाच्या मेंदूची वाढ होताना खेळण्याच्या व झोपण्याच्या सवयी पालकांनी मोडू नयेत. नवीन नियमानुसार आता १ली पासून शिक्षण द्यावयाचे आहे. पहिली व चौथी या इयत्तेतील मुलांना नापास करावयाचे नाही असा नियम आहे. त्याची क्षमता तपासावयाची. वर्षातून ४ क्षमता चाचण्या असतात. एखादा मुलगा पहिल्या चाचणीत क्षमतेला उतरला नाही तर त्याला पुढे जाऊ द्यावयाचे. त्याची क्षमता वाढविण्याचा शिक्षकांनी प्रयत्न करावयाचा. त्यामुळे नापास हा शिक्का बसत नाही.

१ली ते २री मध्ये मुलांना मातृभाषा, गणित, परिसर, इतिहास (छान छान गोष्टी), कार्यानुभव, संगीत, चित्रकला असे विषय असतात. ३री व ४थीत त्यात नागरिकशास्त्र, भूगोल, सामान्य विज्ञान यांची भर पडते. परिसर विषय नसतो. एवढे विषय असूनही दप्तराचे ओझे वाढवायचे नाही त्यामुळे या वयात जे अवांतर वाचन करणे जरूरीचे आहे ते तसे होत नाही. भाषेमध्ये माहिती विचारतात. १ली २रीत गाय, पावसाळा, सण, खेळ व वस्तू यांची माहिती विचारतात व तीच लिहून घेतात. २रीत २ ते १० पर्यंतचे पाढे.

कार्यानुभव मध्ये कागदकाम, आगपेट्यापासून वस्तू बनविणे, मातीकाम, एखादा दिवस, सण, जयंती, वाढदिवस साजरा करणे असे विषय असतात. संगीतात बडबडगीते, बालगीते, अभिनय गीते असतात. भाषा, गणित व परिसर हे विषय ५० गुणांचे असतात व त्यात तोंडीला १०, उपक्रमाला १० व लेखीला ३० गुण असतात. शारीरिक शिक्षणाला ५० व कला विषयाला ५० गुण असतात. त्यात चित्रकला २५, संगीत १५ व कथाकथन १० गुणांचे असून एकूण गुण ३०० असतात.

विद्यार्थ्याला प्रत्येक विषयात ३० गुण मिळणे आवश्यक असते. ३री व ४थीत भाषा, गणित, सा. विज्ञान यांना असलेल्या प्रत्येकी ५० गुणांपैकी तोंडी १०, उपक्रम १० लेखी ३० गुण असतात. इतिहास, भूगोल, ना. शास्त्र एकत्र असून त्याला ५० गुण असतात. त्यात इतिहास, नागरिकशास्त्र २५ व भूगोल २५ गुण असतात. कला विषयाला ५० गुणापैकी चित्रकलेला ३० व संगीत २० गुणांचे असते. ३री व ४थीची परीक्षा एकूण ३५० गुणांची असते. इंग्रजी शाळेतही थोड्याफार फरकाने हाच प्रकार असतो.

वर्षातून ४ क्षमता चाचण्या असतात. क्षमता अ, ब, क, ड, अशा स्वरूपात असते. मराठी व इंग्रजी शाळेमध्ये या गुणांची वर्गवारी खालीलप्रमाणे असते.

| | क्षमता | गुण | शेरा |
|---|---|---|---|
| अ | ३०० - | २४० | उत्कृष्ट |
| ब | २३९ - | २१० | चांगले |
| क | २०९ - | १८० | साधारण |
| ड | १८० - | विशेष लक्ष देण्याची जरूरी. | |

पहिली व दुसरीस पाटी, दगडी पेन्सील, दुसरीत दुरेघी वही आणि शिशपेन्सील, ३री ला व चौथीला वही व शाई म्हणजे बॉलपेन वापरण्यास परवानगी दिली जाते.

पहिली पासून पालकांनी मुलांच्या रोजच्या अभ्यासाची चौकशी करण्यास सुरूवात करावी. शाळेत आज काय घेतले व गृहपाठ काय दिला आहे याची माहिती घेतल्यास मुलांनाही प्रथमपासून आई वडिलांचे अभ्यासाकडे लक्ष आहे याची जाणीव होईल. कितीही झाले तरी १तास मुलांसाठी काढणे जरूरी आहे. सामुदायिक खेळात, धावणे, लांब उडी, अडथळण्याची शर्यत वगैरे मैदानी खेळात ते भाग घेईल. संगीत, वक्तृत्व, पाठांतर, स्पर्धा, शुद्धलेखन, सुवाच्य अक्षर, अभिनय, गायन, वादन, वगैरे स्पर्धेत त्याला उत्साहाने भाग घेण्यास सांगावे, बक्षिस न मिळाले तरी चिकाटीने भाग घेत रहाण्यास व बक्षिस मिळविण्याचा प्रयत्न करण्यास सांगावे. म्हणजे आपसुकच त्याला पुढील काळात अपयश आलेच तर खचून न जाता उमेदीने टक्कर देण्याची प्रवृत्ती तयार होते. जमल्यास बरोबरच्या पालकांना विचारून त्याची प्रगती कशी होईल याकडे लक्ष द्यावे.

४थी पासून मुलाला शाळाबाह्य गणित परीक्षेला बसवावे या परीक्षेचे वैशिष्ट असे की, मुलांना पाठ्यपुस्तकातील उदाहरणांव्यतिरिक्त इतर जास्त उदाहरणे सोडविण्याचा सराव होतो. यासाठी पालकांनी शाळेत चौकशी करून मुलांना या परीक्षेला अवश्य बसवावे. या परीक्षेसाठी वेगळी फी आहे तरी तेवढा खर्च पालकांनी अवश्य सोसावा.

मूल थोडे हुशार असेल म्हणजे ७०-८० टक्के गुण मिळविणारे असेल तर त्याला शिष्यवृत्तीच्या परीक्षेला बसवावे. बऱ्याच पालकांची, "ही परीक्षा अतिशय कठीण असून शिष्यवृत्ती मिळणे कठीण आहे तसेच मुलांना शाळा व शिष्यवृत्ती ह्या दोन्ही वर्गांचा अभ्यास जास्त होतो" अशी समज असते. परंतु जर मुलाला गणिताची गोडी भावी आयुष्यात लागावयास हवी असेल तर त्याला शिष्यवृत्ती परीक्षेला जरूर बसवावे. त्यामुळे मुलाला बरेचसे गुणाकार भागाकार, सूत्र वगैरे लक्षात ठेवण्याची सवय होते व

(पान क्रमांक ९ वर)



विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष चौथे / अंक २ / ऑगस्ट १९९९

**संपादक**
श्री. अचलकुमार टिळू

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
श्री. संतोष राणे
श्री. संजय बोरकर
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
सौ. भारती जोशी
सौ. विजया भंडारे
सौ. मंगला पाटनेकर
कु. दिपाली भाटकर
कु. सुगंधा चव्हाण

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
ठाणे - ४०० ६०१.
दूरध्वनी : ५३४ १२ ११

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिळू | मुखपृष्ठ |
| २) | दृष्टिकोन | डॉ. सौ. अरुणा तिजारे | ३ |
| ३) | पदवी आणि रोजगारांची उपलब्धता- एक कटु सत्य आणि त्यावरील उपाय | प्रा. भा.ना. लाड | ६ |
| ४) | कारगिलमधील महाभारत आणि जागतिक राजकारणाचे बदलते संदर्भ | श्री. प्रशांत देशपांडे | १० |
| ५) | वटपौर्णिमा - एक नवी संकल्पना | डॉ. माधुरी पेजावर | १५ |
| ६) | नियतकालिकातील साहित्य-एक चिंतन | श्री. रवींद्र मांजरेकर | १८ |
| ७) | शिक्षणाचे माध्यम : इंग्रजी की मराठी ? | सौ. मंजिरी वा.दांडेकर | २१ |
| ८) | कविकुलगुरु कालिदास आणि प्रेम | श्री. अरविंद दोडे | २५ |
| ९) | असं व्हायला नको होतं ! | सौ. मिताली इंगवले | २८ |
| १०) | स्पर्धा | श्री. संजय गुमास्ते | २९ |
| ११) | छंद माझा आगळा | श्री. अशोक मुळ्ये | ३१ |
| १२) | 'न्यायमंदिरात लोकमान्य टिळक' टिळक विचाराकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोण | प्रा. मोहन पाठक | ३३ |
| १३) | मनोगत - एका गिर्यारोहकाचे | श्री. प्रदीप स. केळकर | ३५ |
| १४) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३८ |

सुविचार संकलन श्री. विजय माने बांदोडकर महाविद्यालय यांनी केले आहे.

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

# दृष्टिकोन

**डॉ. सौ. अरुणा तिजारे**

*(दहावीच्या निकालासंबंधी सर्व जण विचार करत असतात. गुणवत्ता धारकांचे अति कौतुक, अनुत्तीर्णांची अति उपेक्षा, प्रतिकूल परिस्थित झगडत उत्तीर्ण होणारांची उपेक्षा... प्रत्येकाचे दृष्टिकोन वेगळे असतात. परंतु मानसशास्त्रज्ञाचा हा दृष्टिकोन अधिक अंतर्मुख करणारा असतो. त्या दृष्टीने सदर लेख वाचनीय ठरावा - संपादक)*

एकदा माझ्या एका मैत्रिणीने आपल्या चिरंजीवाचा एक मजेदार किस्सा सांगितला. तिचा मुलगा दहावीला. म्हणजे आई वडिलांची मानसिक स्थिती तुम्ही समजू शकता. मुलाला प्रिलिम्स मध्ये ८६ टक्के गुण मिळाले. आई त्याला म्हणाली,''अरे राजू, तुला अजिबात (?) अभ्यास न करता एवढे मार्कस् मिळाले, जर तू थोडा मन लावून अभ्यास केलास तर मेरीट मध्ये सहज येशील.'' चिरंजीव थोडा वेळ विचारात पडले आणि मग म्हणाले ''अग आई, तू चार तास फॅक्टरीत बसतेस नं? मी जर तुला म्हणालो की चार च्या ऐवजी आठ तास बसत जा, म्हणजे तू पण टाटा-बिर्ला होशील, शक्य आहे का?'' मुलाच्या जीनियस पुढे आईचे तोंड बंद झाले. पण तिच्या तोंडून हा प्रसंग ऐकताना माझे विचार मात्र चालू झाले.

मुलाचे बोलणे १०० टक्के खरे होते. अगदी मेरीट मध्ये आलेली किती मुले पुढच्या जीवनात यशस्वी होतात?

परीक्षेतील यश = जीवनातील यश असे समीकरण आपण सगळे गृहीत धरतो आणि एखाद्या मुलाजवळ तीव्र बुद्धिमता असेल आणि परीक्षेत त्याला उज्वल यश मिळाले की तो आपल्या जीवनात नक्की यशस्वी होईल अशी आपल्याला खात्री असते. त्यामुळे आपण पालक, विद्यार्थी, शिक्षण संस्था, समाज आपला १०० टक्के पैसा आणि मेहनत ह्या परीक्षेतल्या गुणांच्या मागे लावतो. एवढेच नाही तर आपल्या मुलाची किंमत सुद्धा आपण त्याच्या परीक्षेतल्या यशावरच ठरवतो.

पण प्रत्यक्षात मात्र अशा शाळा कॉलेजेस् मध्ये यशस्वी झालेल्या मुलांच्या जीवनात तुम्ही १०,१५ वर्षांनी डोकावलात तर यापैकी ९९ टक्के मुले तुम्हाला सर्वसाधारण आयुष्य जगताना दिसतील. याउलट कधीकधी आपण पाहतो की सामान्य बुद्धिमतेची मुले जी शाळा कॉलेजच्या जीवनात कुठेही चमकली नाहीत ती अचानक डोळे दिपतील, एवढे यशस्वी जीवन जगताहेत.

असं का व्हावं? नशीब किंवा दैव हे यामागचं कारण असू शकतं का? बऱ्याच लोकांच्या मते हेच कारण असतं पण मानसशास्त्रज्ञांचे मात्र ह्या उत्तराने समाधान होणार नाही. तीव्र बुद्धिमत्ता, पैसा, परीक्षेतील यश ह्या गोष्टी जर तुम्हाला जीवनात यश, आनंद देण्याची खात्री देत नाहीत, तर असे काय आहे जे तुम्हाला जीवनात हमखास यशस्वी बनवू शकेल?

एकदा Harvard University त केलेल्या एका अभ्यासात असे निष्पन्न झाले की एखाद्या व्यक्तीला जेव्हा नोकरी मिळते तेव्हा ८० टक्के ती त्याच्या दृष्टिकोन आणि वागणुकी (Right Attitude) वरून मिळते आणि फक्त २० टक्के तो किती हुशार आणि स्मार्ट आहे ह्यावर अवलंबून आहे. इतका हा दृष्टिकोन महत्वाचा असताना सुद्धा किती शिक्षणसंस्था, आईवडील मुलांना हा सशक्त दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न करतात?

आताच आपण एका आईचे उदाहरण पाहिले. जी मुलाने ८६ टक्के मार्कस् मिळवल्यावर त्याचं कौतुक करायचं सोडून न मिळालेल्या टक्क्यांकडे पाहून असमाधानी आहे. मुलांनी अजून चांगले यश मिळवावे, मेहनती व्हावे असे वाटणे योग्य आहे. त्यासाठी त्यांना प्रेरणा द्यायलाच हवी. पण तुमच्या नकळत, तुम्ही न मिळालेल्या टक्क्यांवर लक्ष

केंद्रित करून मुलांना आयुष्यात ज्या गोष्टी मिळाल्या नाहीत त्यांच्यावर लक्ष केंद्रित करण्याचं शिक्षण देता. अर्थात अर्धा रिकामा पेला पहायला शिकवता, कारण मुले ५० टक्के मोठ्यांच्या अनुकरणाने शिकतात. ह्या छोट्याशा गोष्टींचा मुलांच्या दृष्टिकोनावर लहानपणापासून किती मोठा परिणाम होतो ते आपण पाहू या.

सगळ्यात पहिले तर "आम्ही कितीही मेहनत केली किंवा यश मिळवले तरी आईवडिलांना समाधानच नाही" हे त्यांचे मोठ्यां बद्दल (रास्त) मत बनतं. एका मुलीने मला एकदा Workshop मध्ये सांगितले, "मॅडम मला ९० टक्के मार्कस् मिळाले ना, तरी माझी आई म्हणेल अगं किती सिली मिस्टेक मुळे तू २ मार्कस् घालवलेस." काही फायदाच नाही अभ्यासाचा. आईवडिलांना काही आम्ही समाधानी करू शकत नाही." एकदा असा नकारात्मक दृष्टिकोन मुलांनी घेतला की त्याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर व्हायला सुरुवात होते. ते सुद्धा मग आईवडिलांनी त्यांच्यासाठी काय काय आणलयं, त्यांच्यासाठी काय काय केलयं हे न पाहता काय काय ते देऊ शकले नाहीत ह्याचा विचार करून असमाधानी होतात. असामाधानी, नकारात्मक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व, चिडचिडे, आळशी, नैराश्यपूर्ण, निष्काळजी आणि बेदरकार होत जाते. वर्णन ओळखीचे वाटतेय न? तुमच्या मुलाचे तर नाही? हे वर्णन आजच्या ९५ टक्के मुला मुलींचे आहे. असा आयुष्याचा दृष्टिकोन असलेली मुले परीक्षेत यश मिळूनही जीवनात यशस्वी आणि आनंदी होतील असे शक्य आहे का? मग त्यावर उपाय काय?

प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ डॉ. डॅनियल गोलमन म्हणतो की, "माणसाच्या व्यक्तिमत्त्वात असे काही गुण आहेत की जे बाहेर काढले तर तो हमखास यशस्वी होऊ शकतो." ह्या गुण वैशिष्ट्यांना डॉ. गोलमन भावनिक हुशारी (Emotional Intelligence) म्हणतो.

त्यांच्यामते एखाद्या व्यक्तीकडे तीव्र बुद्धिमत्ता (बौद्धिक हुशारी) खूप पैसा आणि परीक्षेतील उज्ज्वल यश इत्यादी गोष्टी असून सुद्धा त्या व्यक्तीला जीवनात यश मिळेलच याची खात्री देता येत नाही. याऊलट इतर कोणत्याही गोष्टी उपलब्ध नसताना सुद्धा केवळ भावनिक हुशारीच्या बळावर जीवनात अत्युच्च यश मिळण्याची खात्री देता येते." त्यांच्या मते तुमच्या यशात फक्त २०% बौद्धिक हुशारी चा वाटा असतो तर ८०% भावनिक हुशारीचा. ही भावनिक हुशारी नुसतेच यश देत नाही तर सर्वांग परिपूर्ण व्यक्तिमत्त्वाची पण खात्री देते. तसेच हा भावनिक विकास तुम्हाला कुठल्याही वयात साधता येतो.

मानसशास्त्रज्ञाच्या मते होकारात्मक दृष्टिकोन (Positive Thinking) ही अशी एक अद्भुत शक्ती आहे जी तुमच्या आतले सगळे गुण वाढवण्यास मदत करते. होकारात्मक विचार हे भावनिक विकास साधण्याचे परिणामकारक माध्यम आहे. सकारात्मक दृष्टिकोन किंवा आशावादी वृत्ती म्हणजे फाजील आत्मविश्वास, किंवा आंधळेपणाने अव्यवहारी गोष्टी करणे नव्हे तर आशावादी वृत्ती म्हणजे स्वतःच्या दोषांची जाणीव ठेवून, गुणांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्या विकास करणे.होकारात्मक दृष्टिकोन माणसाला आनंदी उत्साही बनवतो. त्याच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वामुळे तो आपोआपच लोकप्रिय होतो हा दृष्टिकोन माणसाला समस्यांकडे कल्पकतेने पाहण्याचा आणि त्यांना सोडविण्याच्या युक्त्या सुचवितो, महत्त्वाकांक्षा आणि आत्मविश्वास देतो. अशी माणसे अपयशाने न खचता जीवनात पुढे सरकतात आणि ह्याच सगळ्या गुणवैशिष्ट्यांना डॉ गोलमन Emotional Intelligence म्हणतो.

यावरून मुलांत लहानपणापासून सकारात्मक दृष्टिकोन वाढविण्यासाठी पालकांनी आणि शिक्षकांनी प्रयत्न करणे किती आवश्यक आहे याचा अंदाज येईल. परीक्षेत गुण मिळविणे महत्त्वाचे आहे. पण सकारात्मक दृष्टिकोनामुळे एकदा आत्मविश्वास आला की मुले परीक्षांमध्ये सुद्धा यशस्वी व्हायला लागतात.

हा दृष्टिकोन वाढवणे ही एक दोन दिवसात होणारी गोष्ट नाही. नुसते तोंडाने सांगून मुले ही गोष्ट शिकणार नाहीत. आपल्या आचरणाने त्यांच्या समोर उदाहरण ठेवावे लागेल.

लहान मुलांना आईवडील, शिक्षक देवस्वरूप

असतात. त्यांच्या शिवाय मुलांना दुसरे जग माहीत नसते. त्याच्यासाठी तुमचे प्रत्येक वाक्य ब्रह्मवाक्य असते. ''तू अगदी मूर्ख आहे. तुला एक काम धड करता येत नाही. आमचा बाळ्या सगळ्या गोष्टीत हुशार आहे फक्त अभ्यासात.... '' सतत अनवधानाने बोलली जाणारी ही वाक्ये नकळत तुमच्या मुलाला अपयशाकडे, नकारात्मक विचारांकडे घेऊन जातात.

टीका किंवा उपरोधात्मक बोलण्याने कोणीही प्रोत्साहित होत नाही. उलट निराश किंवा चिडचिडा होतो. मुलामध्ये उत्साह, प्रेरणा आणि आशावादी दृष्टिकोन वाढवायचा असेल तर त्याचे प्रत्येक छोटे मोठे यश साजरे करा, त्याची प्रशंसा करताना 'फक्त....' 'जर....तर' नी त्याच्यातला आनंद काढून घेऊ नका. प्रशंसेने, आदराने नुसता उत्साह आणि प्रेरणातच मिळते असे नाही तर भावनिक सुरक्षा मिळते. ज्याच्या अभावी व्यक्तिमत्त्वाचा समतोल ढासळण्याची शक्यता असते.

ही भावनिक सुरक्षा मुलांना नुसत्या शालेय जीवनातच नाही तर पुढील जीवनात सुद्धा यशाच्या दिशेने प्रेरित करील.

**डॉ. सौ. अरुणा तिजारे**
१२/४, शैलेश टॉवर,
ए, प्लॉट नं. १२, सेक्टर नं. १९ ए,
नेरूळ, नवी मुंबई - ४०० ७०६.
दूरध्वनी : ५४० २३०६.

•••

## ऑगस्ट महात्म्य

ऑगस्ट महिन्याला भारतीय इतिहासात एक वेगळे महत्त्व आहे. हिंदु दिनदर्शिकेप्रमाणे वर्षातील बरेचसे महत्त्वाचे सण एकत्रित असणारा श्रावणमास याच महिन्याच्या मागे पुढे सुरू होतो. शिवाय स्वातंत्र्यदिन हा राष्ट्रीय महत्त्व असणारा दिवस याच महिन्यातला.

**या वर्षीच्या ऑगस्ट मधील काही महत्त्वाचे दिवस.**

१ऑगस्ट - लो. टिळक पुण्यतिथी
विद्या प्रसारक मंडळ स्थापना (३५)

६ ऑगस्ट - संत एकनाथ पुण्यतिथी
पहिला अणुबॉम्ब हिरोशिमावर (४५)

७ ऑगस्ट - श्रेष्ठकवी गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर पुण्यतिथी

९ ऑगस्ट - नामदेव महाराज पुण्यतिथी
चलेजाव चळवळीस प्रारंभ (४२)
ऑगस्ट क्रांतीदिन
नागासकी शहरावर अणुबॉम्ब (४५)

१० ऑगस्ट - सावता माळी पुण्यतिथी

११ ऑगस्ट - खग्रास सूर्यग्रहण

१२ ऑगस्ट - श्रावण मास आरंभ

१५ ऑगस्ट - स्वातंत्र्यदिन

१६ ऑगस्ट - नागपंचमी

२२ ऑगस्ट - पतेती

२६ ऑगस्ट - नारळी पौर्णिमा

•••

# पदवी आणि रोजगारांची उपलब्धता - एक कटु सत्य आणि त्यावरील उपाय

प्रा. भा.ना. लाड

*पारंपरिक शिक्षण कालबाह्य ठरत आहे. पुढील शतक हे व्यवस्थापनाचे शतक आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी या आभ्यासक्रमाकडे पाहण्याची गरज आहे. प्रा.लाड यांनी या मुद्यावर जोर देतानाच मंडळाच्या अभ्यासक्रमाची माहिती दिली आहे. - संपादक*

पदवी कशासाठी मिळवायची ? कॉलेज जीवनाचा अनुभव घेण्यासाठी ? सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी? ज्ञानासाठी ? अधिक चांगली नोकरी मिळविण्यासाठी ?

बहुसंख्य कॉलेज विद्यार्थ्यांकडे यातील शेवटचे उत्तर असते. आपल्या देशात शिक्षण, अगदी उच्च शिक्षणही, शासकीय अनुदानामुळे कमालीचे स्वस्त आहे. त्यामुळे, आजकाल अनेक विद्यार्थी पदवी मिळवू शकतात. पदवीधर म्हणून कदाचित त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळतही असेल, पण पदवी मिळाली म्हणजे रोजगार मिळाला असे क्वचितच होते. काही नोकऱ्यांसाठी पदवी ही आवश्यक अट असते, पण तिथेही नोकऱ्यांच्या तुलनेत इतक्या प्रचंड संख्येने पदवीधर उपलब्ध असतात की त्या पदवीलाही काही अर्थ रहात नाही.

बदलत्या आर्थिक परिस्थितीमुळे आणि शासकीय धोरणांमुळे, उद्योगव्यवसायांचे संगणकीकरण वेगाने होऊ लागले आहे. म्हणजे, यापुढील काळात कारकुनी दर्जाच्या नोकऱ्या उपलब्ध होणार नाहीत. कार्यालये किंवा कारखान्यांत ठराविक प्रकारची, पुनःपुन्हा करावयाची सर्व कामे यापुढे स्वयंचलित यंत्रे करतील. याचा अर्थ असा की पदवीधर झाल्यानंतर पूर्वी मिळे तशी कारकुनी नोकरीही या पुढे मिळणार नाही. या लेखाच्या शीर्षकात उल्लेख केलेले कटु सत्य हे आहे.

पदवी परीक्षा उत्तीर्ण करूनही नोकरी मिळू शकत नाही अशी बहुसंख्य मुले सध्या काय करतात ? काही पदव्युत्तर पदवीसाठी नावे नोंदवितात, काही व्यावसायिक कौशल्ये शिकविणाऱ्या (संगणक संस्थांसारख्या) संस्थांत दाखल होतात, तर काही फक्त नोकरीसाठी प्रयत्न करीत राहतात.

**मार्गदर्शनाचा अभाव**

दुर्दैवाची गोष्ट ही की, या अति महत्त्वाच्या घडीला या मुलांना नीट मार्गदर्शन बहुधा मिळत नाही. बहुसंख्य पदवीधर त्यामुळे चुकीचे अभ्यासक्रम निवडतात आणि ते पूर्ण केल्यानंतर रोजगार मिळत नसल्याने प्रचंड निराश होतात. त्या नैराश्यातून वैफल्य येते आणि ते न्यूनगंडाचे बळी होतात. काहीजण अनैतिक व / वा समाजघातक गुन्हेगारी पेशांकडे ढकलले जातात. जी युवाशक्ती समाजाच्या प्रगतीसाठी उपयोगी पडली पाहिजे, ती समाजविघातक कामात ढकलली जावी, यासारखे दुर्दैव दुसरे कोणते ?

परिस्थितीला दोष देऊन आपण हा प्रश्न सोडवू शकत नाही. बदलत्या परिस्थितीचा अभ्यास करुन त्या प्रमाणे योग्य पावले उचलली तरच काही तरणोपाय आहे.

अर्थव्यवस्थेचे उदारीकरण आणि जागतिकीकरण झाल्यामुळे कार्यालये व कारखान्यात वेगळ्या प्रकारच्या कौशल्यांची आवश्यकता निर्माण झाली आहे. वाढत्या स्पर्धेला यशस्वीपणे तोंड देऊन प्रगती करण्यासाठी,

व्यावसायिक मनोवृत्तीच्या नेत्यांची आवश्यकता आहे. वेगळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, प्रशासना (Administration) पेक्षा व्यवस्थापना (Management) ची आवश्यकता आज अधिक आहे. कंपनीच्या उद्दिष्टांना व तत्त्वांना समजून घेऊन आपल्या सहकाऱ्यांच्या क्षमता वाढवून, परिस्थितीतील संकटे आणि संधी यांचा आढावा घेऊन, प्रतिस्पर्ध्यांच्या बलस्थानांचा आणि मर्मस्थानांचा नीट अभ्यास करून कंपनीची प्रगती करणारे निर्णय घेऊन जो ते यशस्वीपणे राबवतो, असा व्यवस्थापक सर्वच कंपन्यांना हवा असतो. या पदासाठी, परिस्थितीचा अभ्यास, प्रतिस्पर्ध्यांवर सलग नजर ठेवणे. आणि त्यानुसार नवनवी सृजनशील धोरणे आखणे, नियोजन करणे व कार्यवाही करणे यासाठी आवश्यक ती भविष्यदर्शी व सतत आव्हाने स्वीकारण्याची मनोवृत्ती लागते. पदवी परीक्षेपर्यंतच्या कोणत्याही अभ्यासक्रमांत अशा मनोवृत्तीचा विकास करणारे शिक्षण दिले जात नाही. तसेच, संगणक, चार्टर्ड वा कॉस्ट अकाउंटन्सी किंवा कंपनी सेक्रेटरी यांसारख्या अभ्यासक्रमात प्रामुख्याने एकाच प्रकारच्या कौशल्याचा विकास केला जातो. व्यवस्थापकाला अशा विशेषज्ञांकडून काम करून घ्यायचे कौशल्य विकसित करावे लागते. बदलत्या काळात व्यवस्थापकीय कौशल्य विकसित केलेले पदवीधरच कारखाने वा कार्यालयात यशस्वी होतील. ज्यांना हे जमणार नाही, त्यांना स्पर्धात्मक जगात काही स्थान राहणार नाही.

आज व्यवस्थापनाचे पदवी व पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्या विद्यापीठाशी संलग्न किंवा स्वतःचा(Autonomous) अभ्यासक्रम चालवितात. त्यांतील काहींचा या क्षेत्रात दबदबाही आहे.

### व्यवस्थापनाचे शिक्षण

आज व्यवस्थापन हे अनेक पदरी कौशल्य आहे. यात जितके महत्त्व ज्ञानाला आहे, तितकेच, किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्व प्रत्यक्ष अनुभवाला आहे. अगदी प्रसिद्ध व्यवस्थापन संस्थाही व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव आपल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊ शकतातच असे नाही. असा अनुभव नसेल, तर व्यवस्थापनासाठी आवश्यक अशी मानसिकता तयार होत नाही. म्हणूनच, बहुसंख्य नामवंत व्यवस्थापन संस्थांतून बाहेर पडणारे पदवीधर कंपन्यांमध्ये 'प्रशिक्षणार्थी व्यवस्थापक' म्हणून स्वीकृत होतात व एक वर्षभर प्रत्यक्ष अनुभवाचे प्रशिक्षण घेतात.

व्यवस्थापकीय संकल्पना आणि तांत्रिक कौशल्यांच्या विकास वर्गातील शिक्षणाने होऊ शकतो. परंतु, व्यवस्थापकीय कार्यपरिस्थिती (Work environment) ची जाणीव होण्यासाठी व व्यवस्थापकीय मानसिकता (managenial attitude ) विकसित होण्यासाठी, वर्गातील शिक्षणाबरोबर विविध उद्योगसंस्थांत प्रत्यक्ष काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे.

विद्याविहारपासून उत्तरेकडच्या मध्य उपनगरांत एकही व्यवस्थापकीय प्रशिक्षण संस्था पदवी स्तरांबरोबरचे अभ्यासक्रम चालवीत नाही. भांडुप, मुलुंड, ठाणे, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर व अंबरनाथ या परिसरात हजारो लहानमोठ्या उद्योगसंस्था आहेत, ज्यांना असे प्रशिक्षित व्यवस्थापक हवे आहेत. दुसऱ्या बाजूला, पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले अनेक सक्षम विद्यार्थी रोजगाराच्या शोधात भटकत आहेत. मी मंडळाच्या व्यवस्थापन संस्थेचे संचालकपद गेल्या सप्टेंबर पासून स्वीकारले. तत्पूर्वी सुप्रसिद्ध सिडनहॅम इंन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज रीसर्च अँड आन्त्रप्रनरशिप एज्युकेशन या संस्थेचा मी संस्थापक संयुक्त संचालक( Founder Joint Director) म्हणून काम पहात होतो. त्या संस्थेच्या विद्यार्थी निवडीची, आता सार्वत्रिक झालेली, वस्तुनिष्ठ व शास्त्रीय पद्धती मी विकसित केली. शिवाय, त्या संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय व्यवहारांना शास्त्रीय पद्धती (Systems) घालून देण्याचे कठीण काम व्यावसायिक कठोरतेने केली.

आज, त्या संस्थेच्या १२० विद्यार्थ्यांसाठी २५० चांगल्या कंपन्यांची मागणी येते. आणि संस्थेत होणाऱ्या मुलाखतींतून (Campus Interviews), एक आठवड्याच्या अवधीत, सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या कार्यालयांत नोकऱ्या मिळतात.

ठाणे परिसरातील व्यवस्थापकीय व्यावसायिकांशी चर्चा करून आणि इथल्या पदवीधरांच्या गरजा लक्षात घेऊन संस्थेने व्यवस्थापनातील अभ्यासक्रम सुरू केले. वर्गातील शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळाला पाहिजे, हे या शिक्षणक्रमांमागील मुख्य उद्दिष्ट आहे. व्यवस्थापनाच्या संकल्पन (conceptual) तसेच उपयोजनात्मक (operational) कौशल्यांचा विकास या अभ्याक्रमांतून होईल याची खात्री आहे.

**१) द्विवर्षीय पूर्णवेळ 'बिझनेस मॅनेजमेंट पदविका**

**(Post Graduate Diploma in Business Management)**

वर्गातील १५०० तासांच्या शिक्षणाबरोबरच ठाणे परिसरातील कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा लाभ देणारा असा हा संयुक्त (Integrated) अभ्यासक्रम आहे. प्रॉजेक्टवर्क आणि फील्डवर्क मधून प्रत्यक्ष कार्यानुभव देण्याचे प्रयोजन या शिक्षणक्रमात आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना या शिक्षणक्रमानंतर मासिक रु. ८००० ते १०,००० ची नोकरी मिळू शकेल.

**२) त्रैवार्षिक प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा मॅनेजमेंट डिप्लोमा.**

सहा षण्मासिक सत्रांचा हा अभ्यासक्रम आहे. पहिल्या सत्रानंतर परीक्षा घेतली जाऊन, यशस्वी विद्यार्थ्यांना यशस्वी उद्योजकांच्या बरोबर प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली जाईल. या काळात रु. २००० ते रु. ३००० पर्यंत विद्यावेतन मिळेल. सप्ताहातील पाच दिवस उद्योजकाबरोबर पूर्णवेळ काम आणि सायंकाळी, तसेच उरलेल्या दोन दिवशी वर्गातील शिक्षण उपलब्ध होईल. तीन वर्षांनंतर या विद्यार्थ्यांना रु. १०,००० ते रु. १२,००० पगाराची नोकरी मिळू शकते, किंवा यशस्वी उद्योजकांच्या मदतीने ते स्वतःचा उद्योग सुरू करू शकतात.

**३) आय.सी.डब्ल्यू.ए.आय (कॉस्ट अकाउंटन्सी) सह त्रैवार्षिक बिझिनेस मॅनेजमेंट डिप्लोमा.**

यातील अभ्यासक्रम दोन्ही शिक्षणक्रमांसाठी पूरक असून कॉस्टिंग प्रमाणपत्राबरोबर मॅनेजमेंटचा डिप्लोमा पूर्ण झाल्यास अशा विद्यार्थ्यांना दुहेरी फायदा मिळून मासिक रु. १२००० ते रु. १५००० पर्यंत उत्पन्न मिळू शकेल. या शिक्षणामुळे कॉस्टिंगच्या परीक्षेतील २ ते ५ टक्के लागणाऱ्या रिझल्टमध्येही वृद्धी होईल, हा फायदा अलग.

**४) त्रैवार्षिक मार्केटिंग मॅनेजमेंट डिप्लोमा**

क्र. २ प्रमाणे इथेही, प्रथम सत्रान्त परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रसिद्ध कंपन्यांच्या मार्केटिंग विभागात पाच दिवस प्रत्यक्ष कामाची संधी मिळेल. दर सप्ताहात १५ तास वर्गातील शिक्षण दिले जाईल. तीन वर्षीय अभ्यासक्रमानंतर मासिक रु. ८००० ते रु. १०००० पर्यंतचा पगार देणारी नोकरी मिळू शकते.

व्यवस्थापन शिक्षण संस्था विद्यार्थ्यांत क्षमता निर्माण करते. कंपन्यातील प्रत्यक्ष काम, प्रोजेक्ट्स, असाइन्मेंट्स, समर प्लेसमेंट यांतील विद्यार्थ्यांच्या कुशलतेतून त्या त्या कंपन्यांना त्यांच्या क्षमतेवर विश्वास

निर्माण होतो. विद्यार्थ्यांसाठी नोकऱ्या अशा विश्वासातून त्यांच्या शिक्षणकाळातच निर्माण होतात. नुसते वर्गातील शिक्षण देणाऱ्या संस्थांपेक्षा या संस्थेच्या विद्यार्थ्यांची क्षमता संयुक्त (Integrated) प्रशिक्षणामुळे निश्चितच अधिक असेल.

ठाणे कॉलेजच्या व्यवस्थापन संस्थेने प्लेसमेंट सेल सुरु केला आहे. कॉर्न प्रॉडक्टस् (इंडिया) लिमिटेड या कंपनीचे एच्.आर.डी.चे निवृत्त जनरल मॅनेजर श्री. पुणतांबेकर हे त्या सेलचे संचालक आहेत. नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट या संस्थेच्या पश्चिम विभागाचे ते अध्यक्ष होते. सर्व कंपन्यांचे पर्सोनेल मॅनेजर या संस्थेचे सदस्य असतात. श्री. पुणतांबेकरांचा त्या सर्वांशी सतत संपर्क असतो. या प्लेसमेंट सेलची भावी यशस्विता यामुळे निश्चित झाली आहे.

ठाणे परिसरातील विद्यार्थ्यांच्या व उद्योग जगताच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्यासाठी लागणारे प्रशिक्षित अधिकारी तयार करण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापर संस्थेने हा उपक्रम यंदापासून सुरू केला आहे. शैक्षणिक आणि औद्योगिक नेतृत्वांनी एकत्रितपणे आपल्या समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्य करावे, हे त्यामागचे उद्दिष्ट आहे.

या अभ्यासक्रमाविषयी आणि संस्थेविषयी अधिक माहिती तसेच व्यावसायिक मार्गदर्शन संस्थेच्या कार्यालयात सायं ४ ते रात्री ८ पर्यंत उपलब्ध होईल. दूरध्वनी क्र. ५३६३७३४, ५४४६५५४.

प्रा. भा.ना.लाड
संचालक, वि.प्र. मंडळाची
व्यवस्थापन शास्त्र संस्था,
ठाणे

(मुखपृष्ठ २ वरून)

संपादकीय

प्राथमिक शिक्षण

कोणत्याही गणिताचे उत्तर युक्त्या प्रयुक्त्यांनी लवकर कसे काढावे याची माहिती होते. तसेच या परीक्षेतील बुद्धीमत्ता चाचणी या विषयामुळे मुलाची आकलनशक्ती व बुद्धिमत्ता विकसित होते. भाषेच्या परीक्षेमुळे मराठीत स्वतंत्रपणे चार वाक्य लिहावयाची तयारी होते. तसेच मुद्यावरून कोणत्याही विषयावर निबंध कसा लिहावा याची सवय होते. शाळेतून ३री त ७५% पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी विचारले जाते. या परीक्षेला बसविल्याने मुले आहेत त्याच्यापेक्षा नक्कीच अधिक तल्लख होतील. फक्त त्यांचे शाळा व शिष्यवृत्ती हे दोन्ही वर्ग व्यस्थित पार पडण्यासाठी व मुलाचा शेवटपर्यंत उत्साह राहण्यासाठी मुलांच्या आरोग्याची व खाण्यापिण्याची पालकांनी जास्त काळजी घ्यावी. मुलाला भरपूर पोष्टिक अन्न व घरात आनंदी वातावरण कसे राहील याकडे लक्ष द्यावे.

ज्या मुलांना अभ्यासाव्यतिरिक्त इतर विषयात गोडी असेल त्यांना खेळ, चित्रकला, संगीत, वक्तृत्व, निबंध, पाठांतर वगैरे स्पर्धांना पालकांनी जरूर पाठवावे. शाळेतल्या सर्व कार्यक्रमात मूल उत्साहाने भाग घेईल हे पहावे. तसे त्याला घरून सतत सांगावे.

ही भावी पिढी लहान वयात वेळीच संस्कारीत झाली तर मोठेपणी आपसूकच ती वाईट व्यसनांपासून दूर राहील.

अचलकुमार टिल्लू
संपादक

# कारगिलमधील महाभारत आणि जागतिक राजकारणाचे बदलते संदर्भ

श्री. प्रशांत हेमकांत देशपांडे

*( कारगिल युद्धाचा अनुषंगाने इतिहासाचा वेध घेऊन जुलै मध्यापर्यंतच्या घटनांवर आधारित हा लेख श्री. देशपांडे यांनी लिहिला आहे. कारगिल येथे संदर्भ या लेखाचा निमित्ताने उलगडण्यात आला आहे. -संपादक)*

चीनच्या कम्युनिस्ट क्रांतीचा प्रणेता माओ-त्से-तुंग एकदा म्हणाला होता की, ''कूटनीती म्हणजे चार भिंतीच्या आत लढलं जाणारं युद्ध असतं, तर युद्ध म्हणजे खुल्या मैदानात खेळली जाणारी कूटनीती असते.'' हे उद्गार जगातील कोणत्या दोन देशांमधील संबंधांना अगदी तंतोतंतपणे लागू पडत असतील तर ते म्हणजे भारत आणि पाकिस्तान ! नियतीच्या तडाख्याने म्हणा या इतिहासाच्या अपघाताने, या उपखंडाचे तुकडे झाले त्या घटनेला पन्नास वर्षे उलटून गेली. तरी अजून भारत-पाक संबंधांमध्ये शह-काटशह यांचा खेळ चालूच आहे. प्रत्येक वेळी युद्धात दारुण पराभव होऊनही भारतावर या ना त्या मार्गाने कुरघोडी करणाऱ्या पाकिस्तानच्या प्रयत्नांमध्ये अजिबात खंड पडलेला नाही. या मे महिन्यात काश्मीर सीमेवरील कारगिल-द्रास-बटालिक सीमेवर भारतीय प्रदेशात घुसखोरी करून पाकिस्तानने काढलेली कुरापत हा या श्रृंखलेतील सगळ्यात ताजा अध्याय! मात्र कारगिलमधील वातावरण तूर्तास निवळल्यावर देखील काश्मीरमध्ये व भारत-पाक संबंधांमध्ये असलेला तणाव कमी होऊन शांतता व सौहार्द नांदेल असे वाटत नाही. केवळ धार्मिक भिन्नता वगळता, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात बऱ्याच बाबतीत समानता असलेल्या या दोन शेजारी राष्ट्रांमधील, संघर्षाची धग कधीच विझणार नाही का? या संघर्षाला सध्याच्या जागतिक राजकारणातील बदलत्या संदर्भांचे परिमाण आहे काय? या प्रश्नांची उत्तरे शोधतानाच कारगिलमधील धुमश्चक्रीच्या पार्श्वभूमीवर भारतीय परराष्ट्रनीती व राष्ट्रीय सुरक्षानीतीतील बदलत्या प्रवाहांचा वेध या लेखात घेण्याचा प्रयास आहे.

### अणुयुद्धाच्या भीतीचे भांडवल

या वर्षाच्या सुरुवातीचे काही महिने पाक लष्कराच्या काश्मीरमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या परिसरात हालचाली सुरू होत्या. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात जेव्हा घुसखोरीचा सुगावा भारतीय लष्कराला लागला तोपर्यंत सुमारे २५ किलोमीटर पर्यंतचा प्रदेश शत्रूने व्यापला होता. काश्मीरच्या विशेषत: कारगिल परिसरातील डोंगराळ व दुर्गम भागामुळे पाकिस्तानने या परिसराची घुसखोरीसाठी निवड केली असणार यात शंका नाही. पण याहीपेक्षा काश्मीरची सीमा आक्रमणासाठी निवडण्यामागे पाकिस्तानचा मोठा डाव होता. काश्मीरचा प्रश्न पाकिस्तान गेली पन्नास वर्षे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडण्याचा प्रयत्न करत आला आहे. कधी त्यासाठी प्रत्यक्ष लष्करी कुरापतींचा आधार घ्यावा तर कधी दहशतवाद्यांना शस्त्रसामुग्री व प्रशिक्षण देऊन हिंसाचार माजवायचा आणि नंतर मानवाधिकारांच्या नावाने हाकाटी पिटायची असा याचा क्रम चालू असतो.

वर्षानुवर्षे चिघळत राहिल्याने काश्मीर प्रश्नाचे महत्त्व आपोआपच कमी झाले होते. बोथट झालेल्या या विषयाला नवी धार चढवण्याची संधी पाकिस्तानी राज्यकर्ते शोधतच होते. तशातच मे १९९८ मध्ये भारताने पोखरणमध्ये अणुस्फोट केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून त्याच महिन्याच्या

शेवटी पाकिस्ताननेही बलुचिस्तानमधील चगाई येथे अण्वस्त्रचाचणी केली. दोन्ही देशांकडे मागील दहा वर्षांहून अधिक काळापासून अण्वस्त्रसज्जता होती हे उघड गुपित होते. परंतु प्रत्यक्ष चाचण्यानंतर त्यावर शिक्कामोर्तब झाले. उपखंडाच्या अण्वस्त्रीकरणानंतर पाकिस्तानच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या. भारत-पाक यांच्यातील भविष्यातील कोणताही सर्वंकष संघर्ष अणुयुद्धाचे रूप घेणार, असे स्पष्ट झाल्यावर पाकिस्तानने जागतिक व्यासपीठावर असा मुद्दा मांडायला सुरुवात केली की, ''काश्मीर म्हणजे एक ज्वालाग्रही कोठार आहे आणि बारीकशी काडी लागण्याचा अवकाश की, संपूर्ण उपखंड अणुयुद्धाच्या खाईत लोटले जाणार.'' या युक्तिवादामागचा तर्क असा होता की, 'अणुयुद्धाचे परिणाम केवळ दोन देशांपुरते मर्यादित न राहता, जगातील इतर देशांनाही किरणोत्सर्गाचा त्रास होणार. त्यामुळे घाबरून जाऊन जगातील इतर विशेषत: पाश्चात्य राष्ट्रे काश्मीर प्रश्नात मध्यस्थी करतील आणि काश्मीर समस्येचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा पाकिस्तानी कावा सफल होईल.' १९७२ साली भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या सिमला करारानुसार काश्मीर प्रश्न द्विपक्षीय चर्चेनुसार सोडवायला उभयपक्षांनी मान्यता दिली होती. परंतु पाकिस्तानला हा मुद्दा मनापासून कधीच मान्य झाला नाही. म्हणूनच आंतरराष्ट्रीय समुदायातील अणुयुद्धाच्या भीतीचे भांडवल करून 'जैसे थे' स्थिती बदलण्याचा बेत पाक राज्यकर्ते व लष्करातील अधिकाऱ्यांनी मिळून आखला.

भारताला गाफील ठेवण्यासाठी शरीफ सरकारने वाजपेयींना लाहोर भेटीचे आमंत्रण दिले. लाहोर येथे परस्परांसंबंधी विश्वास वाढवण्याच्या उपायांवर सहमती झाली. काहींना वाटले अण्वस्त्रसिद्धता मिळाल्यावर पाकिस्तान खरोखरीच एक जबाबदार राष्ट्र बनले की काय! पण त्यांचा भ्रमनिरास होण्यास फार काळ लागला नाही. इकडे ओठात शांततेचा जप चालू असताना आतून सगळ्या शांतता प्रयत्नांना सुरुंग लावण्याचे पाकिस्तानचे प्रयत्न चालूच होते. 'टाइम' या जगद्विख्यात साप्ताहिकाने प्रसिद्ध केलेल्या बातमीनुसार लाहोर भेटीच्या आधीपासून म्हणजे जन. परवेझ मुशर्रफ पाक सेनेच्या प्रमुखपदी आल्या दिवसापासूनच कारगिलमधील घुसखोरीच्या कटाला सुरुवात झाली होती. पाक लष्करातील काही मुत्सद्यांचा असा होरा होता की, 'भारतीय लष्कराच्या व गुप्तचर यंत्रणांच्या नजरेत इतक्या दुर्गम भागातील संथ हालचाली लक्षात येणार नाहीत. आल्या तरी भारत वायुसेनेचा वापर करणार नाही आणि जमिनीवरील युद्ध हिवाळ्याच्या आत काही संपणार नाही.' कारगिलची संघर्षासाठी निवड करण्यामागे पाकिस्तानची आणखी एक अटकळ होती. ती म्हणजे, 'काश्मीर खोऱ्याला भारतातील उरलेल्या भागाशी जोडणारा एकच रस्ता आहे. तो म्हणजे जम्मू-लेह राष्ट्रीय महामार्ग हा महामार्ग कारगिल परिसरातून जातो. एकदा या महामार्गावर ताबा मिळवला की, संपूर्ण काश्मीर खोरे भारतापासून वेगळे पडेल. हिवाळ्यापर्यंत लढाई चालू राहिली की, मग भारतीय लष्कराला पुन्हा सगळ्या प्रदेशावर ताबा मिळवण्यासाठी हालचाली करणे दुरापास्त होऊन बसेल. कारण हिवाळ्यात काश्मीरच्या पर्वतीय प्रदेशातील तापमान शून्य अंशाच्याही बरेच खाली जाते व त्या परिसरात जोरदार हिमवृष्टी सुरू होते.' काश्मीर हस्तगत करण्याच्या जोमाने पाकिस्तानी लष्करातील नॉर्दन लाइट इन्फंट्रीच्या धट्ट्याकट्ट्या पठाण नि अफगाण सैनिकांना सावकाशीरत्या नियंत्रण रेषेपार पाठवून उंचावरच्या मोक्याच्या ठिकाणांवर पाकिस्तानने मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत कब्जा मिळवला.

### काश्मीर प्रश्न : रोग की रोगाचे लक्षण

वरील वर्णनावरून एखाद्याला असे वाटेल की काश्मीर प्रश्न भारत-पाक संघर्षाच्या मुळाशी आहे. पण या गैरसमजाचे निराकरण करणे अतिशय सोपे आहे.

समजा काश्मीर प्रश्न वादग्रस्त नसता तर भारत-पाक संबंध शांततामय राहिले असते का? याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. १९७१ चे युद्ध प्रामुख्याने बांगला देशच्या प्रश्नावरून झाले. १९६५च्या युद्धाचे मुख्य कारण कच्छच्या रणातील तणाव हे होते. फक्त १९४७ मधील उभय देशातील संघर्ष खऱ्या अर्थाने काश्मीर प्रश्न असो वा नसो भारत-पाक यांच्यातील वितुष्ट कायम राहणार मग असे कोणते घटक आहेत की ज्यांच्यामुळे या देशांनी एकमेकांशी उभा दावा मांडलेला आहे ?

**पार्श्वभूमी**

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला पाकिस्तानच्या निर्मितीकडे थोडासा दृष्टिक्षेप टाकावा लागेल. पाकिस्तानची निर्मिती द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतातून झाली. द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचे मुख्य सूत्र होते की, 'भारतीय उपखंडातील सर्व मुसलमान एक राष्ट्र आहेत.' यातूनच हिंदूपेक्षा अधिक शक्तिशाली राष्ट्र आम्ही उभारू शकतो, अशी स्पर्धेची भावना ओघानेच आली. वास्तविक पाहता या स्पर्धेत गैर वाटण्याचे काहीच कारण नाही. परंतु आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात निरोगी स्पर्धा करून भारताशी बरोबरी साधण्याऐवजी लष्करी बळाच्या जोरावर वा मुत्सद्दीपणाच्या जोरावर भारताशी बरोबरी साधण्याचा मार्ग पाकिस्तानने निवडला. यातूनच स्वतःच्या स्वतंत्र सामाजिक, आर्थिक आकांक्षा निर्माण न होता पाकिस्तानची राष्ट्रीय अस्मिता 'प्रतिक्रियावादी राष्ट्रवादाच्या' चौकटीत अडकून पडली याचे महत्त्वाचे कारण म्हणजे राष्ट्रवादाच्या उन्नत संकल्पना ग्रहण करण्याइतकी परिपक्वता पाकिस्तानी जनमानसात अजून आलेलीच नाही.

आजच्या आधुनिक जगात एखाद्या देशाचे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील स्थान प्रामुख्याने त्याच्या आर्थिक यशावर ठरते. परंतु पाकिस्तानच्या राष्ट्रीय सामर्थ्याच्या संकल्पना अजूनही मध्ययुगीनच आहेत. त्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे, पाकिस्तानची समाजव्यवस्थाच जिथे अजून सरंजामी काळात वावरते आहे, तिथे त्यांच्या जागतिक दृष्टिकोन आधुनिक कुठून असणार? अजूनही एखादा गुलाम मुस्तफा जतोई जिथे शेकडो गावांचा मालक असतो, एखादा काझी हुसेन अहमदसारखा धर्मगुरू हजारो मद्रसांचा चालक असतो, सत्तेच्या हस्तांतरणाची सामान्य पद्धत, 'नव्या राज्यकर्त्याने जुन्याला मारून सिंहासन बळकावणे' ही असते, तिथे आंतरराष्ट्रीय धोरणात एकदम आधुनिकता कुठून दिसणार?

आपल्याकडे आजकाल जो तो विचारवंत उठतो आणि नेहरूंना नावे ठेवतो. आर्थिक उदारीकरणानंतर तर या टीकेला भलताच ऊत आला आहे. 'नेहरूंच्या १७ वर्षांच्या कारकीर्दीत त्यांच्याकडून एकही चूक झाली नाही', असे त्यांचा सगळ्यात कडवा समर्थदेखील म्हणणार नाही. परंतु आज भारतात पाकिस्तानपेक्षा जे जे काही वेगळे आणि उन्नत स्वरूपाचे दिसते आहे, त्याचा पाया नेहरूंनीच घातला हे विसरता येणार नाही. भाक्रा-नांगल सारखी आधुनिक तीर्थक्षेत्रे, भाभा अणुशक्ती केंद्र, राष्ट्रीय प्रयोगशाळांचे जाळे, ओ.एन.जी.सी. सारख्या पायाभूत क्षेत्रातील कंपन्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे खुल्या चर्चेला आणि टीकेला वाव असणारी भक्कम लोकशाही या सगळ्यांनी भारतीय जनमानसात नव्या राष्ट्रीय आकांक्षा प्रज्वलित केल्या. आज २१व्या शतकात जाताना भारताची बलस्थाने म्हणून ज्यांच्याकडे बोट दाखवले जाते, त्या आय.आय.टी., आय. आय. एम्. यांच्यासारख्या संस्था ही देखील नेहरूंच्याच कल्पनेची भरारी होती. पाकिस्तानच्या दुर्दैवाने त्यांना कोणी नेहरू मिळाला नाही. जे नेतृत्त्व मिळाले ते एकतर सरंजामी व्यवस्थेत रममाण होणारे, नाहीतर अब्दाली सारख्या लष्करी दिग्विजयाची इच्छा बाळगणाऱ्या लष्करशहांचे!

स्वतःच्या कालबाह्य मानसिक चौकटीतून बाहेर न पडण्याच्या पाकिस्तानच्या मनोभूमिकेमुळेच

---

कारगिलमधील त्यांच्या तथाकथित सुसज्ज आराखड्याचा पुरता फज्जा उडाला. नुसत्या बंदुकीच्या जोरावर आधुनिक राष्ट्र वा राज्यांच्या सीमा बदलता येत नाहीत हा आंतरराष्ट्रीय राजकारणातला पहिला धडा ते विसरले. परिणामी अमेरिकेचा पाठिंबा सोडाच पण पाकिस्तानचा मित्र म्हणवणाऱ्या चीननेही तटस्थपणाची भूमिका स्वीकारली. पाकिस्तानची दुसरी घोडचूक म्हणजे यातना देऊन ठार केलेल्या जाट रेजिमेंटमधील सहा बहादूर जवानांची छिन्नविच्छिन्न प्रेते १० जूनला भारताच्या हवाली केली. या घटनेनंतर भारत सरकारवर कडव्या गटांचा दबाव वाढून भारतातील लष्कराला नियंत्रण रेषा ओलांडण्याचा आदेश द्यावाच लागेल अशी पाक लष्कराची अटकळ होती. असे झाले असते तर, कूटनैतिक स्तरावर भारताने मिळवलेले यश चटकन नाहीसे झाले असते. पण लोकशाही व्यवस्थेत सरकार दूरदृष्टीने व संयमितपणे निर्णय घेऊन लष्करी कारवाई नियंत्रण रेषेपर्यंतच मर्यादित ठेवू शकते, ही कल्पनाच पाकिस्तानी धोरणकर्त्यांच्या बौद्धिक वकूबाला न पेलण्यासारखी होती. म्हणूनच असे म्हणता येईल की, भारताचा कारगिलमधील विजय हा आधुनिकतेचा सरंजामी विचारसरणीवरील, धर्मनिरपेक्षतेचा धर्मांधतेवरील आणि संयमाचा आक्रमकतेवरील विजय आहे.

### अमेरिकेची भूमिका

१९९१ मध्ये शीतयुद्धाचा शेवट आणि सोव्हिएट रशियाचे विघटन झाल्यानंतर अमेरिकेला जागतिक राजकारणात अनन्यसाधारण महत्त्व झाले आहे. या पार्श्वभूमीवर जगातल्या या एकमेव महासत्तेची कारगिल प्रश्नाबाबतची भूमिका पाहणे प्रासंगिक ठरेल. शीतयुद्धाच्या काळात जागतिक समुदायाचे दोन लष्करी गटांमध्ये विभाजन होणे अपरिहार्य होते. भारतासह अनेक विकसनशील देशांनी या लष्करी स्पर्धेपासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न केला तरी शीतयुद्धाच्या वातावरणाची तीव्रता लक्षात घेता तसे करणे कठीणच होते. परिणामी अलिप्ततावाद नावापुरता शिल्लक राहिला आणि भारत जवळपास उघडपणे रशियाच्या गोटात सामील झाला. साहजिकच अमेरिकेने पाकिस्तानला पाठिंबा व प्रत्यक्ष लष्करी आणि आर्थिक मदत देणे सुरू केले. १९७१ मध्ये भारत-अमेरिका संबंध सर्वांत तणावग्रस्त बनले. अमेरिकेने 'एंटरप्राईझ' ही आण्विक पाणबुडी असलेले सातवे आरमार भारताच्या दिशेने पाठवले. १९७९ मध्ये सोव्हिएट रशियाने अफगानिस्तानमध्ये सैन्य पाठवून आपले हस्तक सरकार स्थापन केले. या आक्रमणाला उत्तर म्हणून अमेरिकेने पाकिस्तान मार्फत स्वतःला मुजाहिदीन म्हणवणाऱ्या अफगाण टोळ्यांना मदत करायला सुरुवात केला. त्यामुळे अमेरिका-पाकिस्तान संबंध आणखी घनिष्ट होत गेले आणि भारत अमेरिका यांच्यातील दुरावा वाढत गेला.

परंतु त्याबरोबरीने अमेरिकेच्या गोटात वेगळ्या विचारांचे वारेही वाहू लागले होते. अमेरिकन मुत्सद्दी आणि अमेरिकेच्या परराष्ट्रनीतीचे एक शिल्पकार सॅम्युएल हंटिंग्टन यांनी 'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स' (संस्कृति-संघर्ष) या आपल्या पुस्तकात अशी कल्पना मांडली की, 'पुढील शतकाच्या सुरुवातीस जागतिक स्तरावर पाश्चात्त्य संस्कृतीचा इस्लामिक संस्कृती व चीनशी संघर्ष होईल.' १९८० मध्ये आयातुल्ला खोमेनी यांनी इराणमध्ये क्रांती करून कडवी इस्लामिक राजवट स्थापन केल्यावर या सिद्धांताकडे गांभीर्याने बघितले जाऊ लागले. गेल्या दोन-चार वर्षांत मात्र जागतिक रंगमंचावर अशा काही घटना घडत आहेत की, त्यामुळे अमेरिकन परराष्ट्रनीती शीतयुद्धकालीन मानसिकतेचे जोखड बाजूला सारून संस्कृतिसंघर्षाच्या संकल्पनेच्या आधारावर पुनर्रचनेच्या अनुभवातून जात आहे, असे वाटते.

या संदर्भात सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे चीनचा एक उगवती महाशक्ती म्हणून होत असणारा उदय, झपाट्याने वाढत असलेली चीनची लष्करी आणि आर्थिक ताकद हा अमेरिकन धोरणकर्त्यांच्या चिंतेचा विषय बनत

चालला आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका बातमीनुसार चीनने अमेरिकन संगणकामध्ये साठवून ठेवलेल्या गोपनीय लष्करी माहितीवर डल्ला मारून न्यूट्रॉन बॉंबचे तंत्रज्ञान हस्तगत केले आहे. दुसरीकडे इस्लामिक दहशतवादाचा भस्मासूर आपला जबडा पसरवून जगभर पसरत चालला आहे. तीन-चार वर्षांपूर्वी न्यूयॉर्कच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये झालेल्या बॉंबस्फोटानंतर अमेरिकेला कळून चुकले की, आपणही या दहशतवादापासून पूर्णपणे सुरक्षित राहू शकणार नाही. मागील वर्षी अमेरिकेची सुदान आणि टांझानियातील दूतावासांमध्ये झालेल्या स्फोटांनी ही धारणा अधिकच पक्की केली. त्यावेळी अमेरिकेने या स्फोटांचा सूत्रधार असलेल्या ओसामा-बिन-लादेन या धनाढ्य व्यापाऱ्याच्या सुदान व अफगानिस्तानमधील तळांवर क्षेपणास्त्रांनी हल्ले चढवले होते. त्याप्रसंगी वाजपेयी सरकारने देशातील तीव्र अमेरिकाविरोधी मतांना न जुमानता अमेरिकेची बाजू घेतली होती. वाजपेयींचे वक्तव्य होते की, ''आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या धोक्याचा जगातील सर्व राष्ट्रांनी मिळून मुकाबला केला पाहिजे.'' त्यावेळच्या भारताच्या भूमिकेचा भारताला कारगिलप्रसंगी फायदा झाला.

कारगिलमध्ये घुसखोरी सुरु होताच अमेरिकेने भारताची बाजू उचलून धरली. जी-८ देशांच्या शिखर बैठकीत अमेरिका व इतर सात विकसित राष्ट्रांनी पाकिस्तानला आक्रमक राष्ट्र म्हणून संबोधले आणि तातडतोब सैन्य माघारी घेण्यास सांगितले. इतकेच काय पण आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून पाकिस्तानला मिळणारे २७ कोटी डॉलरचे कर्जदेखील रोखून धरण्यात आले. जागतिक समुदायातील एकूण मत प्रवाह लक्षात घेता चीनने देखील तटस्थपणाची भूमिका स्वीकरली. तिकडे रणभूमीवर भारतीय जवानांनी आपले दुर्दम्य साहस आणि बहादुरीच्या जोरावर, तोलोलिंग, टायगर हिल वगैरे परिसरात घुसखोरांना पुरती धूळ चारली होती. त्यामुळे पाकिस्तानला माघार घेण्यावाचून पर्यायच उरला नाही अखेर ११ जुलैला भारतीय सैन्याचे 'ऑपरेशन विजय' यशस्वी झाले आणि पाकच्या सैनिकांची परती सुरू झाली.

कारगिल युद्ध इतिहासात प्रामुख्याने नोंदले जाईल ते म्हणजे बदलत्या भारत-अमेरिका संबंधांसाठी. जगातील हे दोन सर्वात मोठे लोकशाही देश प्रथमच यानिमित्ताने इतक्या जवळ आले आहे. जसवंतसिंग-अझीझ भेटीआधी भारताने उघड केलेल्या पाकिस्तानच्या दोन वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांमधील संभाषणाच्या ध्वनिफीती पेंटागॉनने भारताला पुरवल्या असा निरीक्षकांचा अंदाज आहे. पण अजूनही जुन्या कटू संबंधांच्या आठवणी दोन्ही देश पुरते विसरले आहेत, असे दिसत नाही. चीनने तटस्थ भूमिका घेतल्याघेतल्या लगेच भारताने त्या वक्तव्याचे स्वागत केले. पण अमेरिकेने पाकिस्तानचा निःसदिग्ध शब्दांत निषेध करूनही त्याची नोंद घेण्यास आपल्या परराष्ट्रखात्याने ३ दिवस लावले. शीतयुद्धाची मानसिकता सोडून देऊन अमेरिकेशी अर्थपूर्ण कूटनीतिक भागीदारी बांधणे आणि त्याबरोबरच स्वतःची स्वायत्ता टिकवून आगामी बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेतील एक सत्ताकेंद्र बनणे हे भारताच्या परराष्ट्रनीतीचे सर्वात मोठे आव्हान असणार आहे. हे आव्हान कठीण नक्कीच आहे परंतु अशक्य खचितच नाही. फक्त हजारो वर्षांपूर्वी महाभारतातील शांतिपर्वात सांगितलेला आणि नंतर गेल्या शतकातील ब्रिटिश मुत्सद्दी लॉर्ड पामस्टेन यांनी दिलेला सल्ला आपण लक्षात ठेवायला हवा,

''आंतरराष्ट्रीय राजकारणात कायमस्वरूपी मित्र नसतात की कायमस्वरूपी शत्रू. असतात ते फक्त कायमस्वरूपी राष्ट्रीय हितसंबंध !''

**प्रशांत हेमकांत देशपांडे**
बी. केम (केमिकल इंजिनिअरिंग), यु.डी.सी.टी., मुंबई
विद्यार्थी:टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टी.आय.एस.एस)
द्वारा: वैशाली पानसे, ए-३, ऑटोमॅटिक इलेक्ट्रिकल्स स्टाफ क्वार्टर्स, पाचपाखाडी, ठाणे (प.),
दूरध्वनी : ५३८ ०३९०

• • •

# वटपोर्णिमा - एक नवी संकल्पना !

**डॉ. माधुरी पेजावर**

*हरियाली संस्थेने यंदा वटपौर्णिमेला एका वेगळ्या पद्धतीने वृक्षांचे रोपण करून हा दिवस साजरा केला. त्या निमित्ताने बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.सौ. माधुरी पेजावर यांचा लेख - संपादक*

महाराष्ट्रीयन माणसाला वटपोर्णिमा काही नवीन नाही ! दरवर्षी जेष्ठ पोर्णिमेला वटपोर्णिमेचा उपास व वडाची पूजा करण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. मूळ संकल्पनेप्रमाणे सती सावित्रीने आपल्या पतीचे - सत्यवानाचे प्राण वाचवण्याकरता देवाला साकडे घातले. तिच्या प्रार्थनेने देव प्रसन्न झाले व सत्यवानाचे प्राण त्यांनी परत दिले. तेव्हापासून अखंड सौभाग्य व जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून वडाच्या झाडाची पूजा करण्याची प्रथा पडली, अशी कथा सांगितली जाते. या मागची कथा काहीही असू दे, पण एक नक्की, की आपल्या पूर्वजांनी महिलांना वडाच्या झाडाची पूजा करायला सांगितली, फांदीची नव्हे ! यामागे एक विचार आहे ! पूर्वी महिला नोकरी करत नसत, तर पूर्णपणे रांधा, वाढा, उष्टी काढा या चक्रात अडकून पडत. यांना कुठेतरी घराबाहेर पडण्याकरता कारण मिळावे म्हणून वेगवेगळे सणवार अस्तित्वात आले असावेत. की जेणेकरून स्त्रीया दुसऱ्या स्त्रीयांत मिसळतील, एकत्र हसतील, खेळतील, गप्पाटप्पा करतील व ताज्यातवान्या होऊन परत कामाला लागतील. यामुळेच चैत्रगौरीची पूजा, मंगळागौर, हरीतालिका, नागपंचमीची पूजा, नवरात्र अशा अनेक सणांबरोबर वटपोर्णिमा साजरी करण्याची प्रथा पडली.

या दिवशी नटून थटून समस्त महिलावर्ग घराबाहेर पडे हसत हसत गावकुसावर वडाच्या झाडाजवळ जाई, की जे या ऋतुत नवीन पानांनी डवरलेले असते, साग्रसंगीत पूजा होत असे, त्या निमित्ताने काही गोड धोड होई, महिलांचे तास - दोन तास मजेत जात. पण सर्वात महत्वाचे त्या घराबाहेर पडत, शुद्ध ताज्या हवेत श्वास घेत व ताज्या तवान्या होऊन घरी परतत.

हल्ली या वटपोर्णिमेचे रूपच पालटलंय. या धकाधकीच्या जीवनात आपल्या गावात वड आहे की नाही हे ही या महिलांना माहीत नसते. मग या सर्व सावित्र्या कामावरून येताना, आदले दिवशी वडाची फांदी विकत घेतात, कधी कधी सत्यवानालच हे काम सांगितले जाते. फांदी रात्री पाण्यात ठेवून कशीबशी जगवली जाते. दुसऱ्या दिवशी कामाला जाण्याच्या आधी पूजा उरकली जाते व संध्याकाळी वाळलेली फांदी कचरा कुंडीत फेकली जाते! बदल्यात कितीजणी हाच सत्यवान जन्मोजन्मी मागतात हे वडच जाणे ! किती ही वटपोर्णिमेची विडंबना ! यात मूळ संकल्पनेची किती वाट लागलीय, ज्या वडाची पूजा करायची तोच वड तोडला जातोय, याकडे कोणाचे लक्षच नसते. आणि बरोबर हीच नस ठाण्याच्या हरियाली संस्थेने पकडली.

हरियालीने समस्त ठाणेकरांना आवाहन केले की अशा वडाच्या फांदीची पूजा करण्यापेक्षा एखादे रोप जर वडाचे प्रतीक म्हणून लावले तर ते पुढे वाढेल, वाढेल व तीच खरी पूजा ठरेल निसर्गपूजा !

अशी पूजा करायला ठाण्यातील व आजूबाजूच्या

सामाजिक संस्था, शाळा, महाविद्यालये, महिलामंडळे व समस्त नागरिक यांना हरियालीने हाक दिली ! आणि काय आश्चर्य, २७ जून, रविवार वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी सकाळी ७ वाजता ५००-५५० जणांचा समुदाय हरियालीत हजर ! यात डोंबिवली कल्याण पासून कांदिवली बोरिवली पर्यंतचे वृद्ध, ठाण्याचे महापौर श्री. वैती, वनाधिकारी श्री. समीर देशपांडे, थोर स्वातंत्र्यसेनानी श्री. दनाजी ताम्हाणे, निवृत्त न्यायाधीश श्री. राजाभाऊ गवांदे, बांदोडकर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सी.जी. पाटील, कला वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. भिडे व इतर कित्येक मान्यवर व्यक्ती हजर होत्या.



सर्वांना उद्देशून श्री. हेमा गुप्ते यांनी एक कल्पना मांडली की कारगिलमध्ये बलिदान केलेल्या सैनिकांच्या नावाने आपण ही रोपे लावताना प्रार्थना करु. सर्व उपस्थितांच्या हातात एक एक रोप देऊन त्यांना हरियालीच्या परीसरात वेगवेगळ्या दिशांना पाठवण्यात आले. पावसाची रिमझिम चालू होती, कोकिळेचे कूजन ऐकायला येत होते, दयाळही एखादी लकेर घेत होता. भारद्वाज एकमेकांना साद घालत होते, बुलबुल मधेच काही सूचना देत होता व या निसर्ग संगीतात हे वेडे निसर्गप्रेमी निसर्गपूजाचा आनंद लुटत होते. फक्त सावित्र्याच नव्हे तर कित्येक सत्यवान जन्मोजन्मी हीच पत्नी मिळो व तिच्याबरोबर याच सुंदर ठाणे शहरात जन्म मिळो असे साकडे देवाला घालत होते. आणि पूनम सिंघवींनी पाहिलेले निसर्गपूजेचे स्वप्न साकार होताना देहि याची डोळा आम्ही बघत होतो.

९ वाजेपर्यंत ७५० रोपे (वडाची प्रतीके) लावली गेली. सर्व उपस्थितांच्या साक्षीने सन्माननीय स्वातंत्र्यसेनानी श्री. दनाजी ताम्हाणे यांच्या हस्ते हरियाली कुटीजवळ एक वडाचे रोप लावण्यात आले. मनात आले वयाच्या ८६ वर्षी ३ आठवडे हॉस्पिटलमध्ये पूर्णपणे विश्रांती घेत असलेला हा गृहस्थ जशी आपल्या आशिर्वादांची छाया या प्रकल्पावर धरायला इथे उभा आहे, तसाच त्याने लावलेला हा वटवृक्षही पुढे १०० वर्षे हरियाली कुटीवर छाया धरेल. धन्य ती कुटी आणि तो परिसर !

नंतर महापौर श्री. वैती व वनाधिकारी श्री. समीर देशपांडे यांचे छोटेखानी भाषणे झाली व बोलायला उभे राहिले निवृत्त न्यायाधीश श्री. राजाभाऊ गवांदे. आपल्या खळखळत्या, ओघळत्या शैलीत त्यांनी निर्सगाच्या एवढ्या लीला सांगितल्या की कान तृप्त झाले.

भारतीय किती नशिबवान हे सांगताना ते म्हणाले की भारतात आपण तीन ऋतुल अनुभवू शकतो, पण जगाच्या पाठीवर असा उन्हाळा, पावसाळा व हिवाळा दुसरीकडे दिसत नाही. या ऋतूंची अनुभूती घेण्यास आपण निसर्गाजवळ आले पाहिजे. पूर्वी आपल्याकडे एवढी दाट जंगले होती की रहायला जागा बांधायला पांडवांना खांडववन जाळायला लागले. रविंद्रनाथ टागोर एकदा म्हणाले की मी जगाच्या पाठीवर सगळीकडे फिरुन आलो, पण माझ्या परसात उभा राहिल्यावर मी हिरव्या पानांवर दवाचा जो पाऊस पाहिला, त्यात आकाशाची प्रतिमा पाहिली तेव्हा असे वाटले की अरे जग तर माझ्या दारात आहे.

---

परमेश्वराने आपल्याला जीवन दिले, त्याच वेळी स्वातंत्र्य दिले. - थॉमस जेफरसन

राजाभाऊंनी एक छान कल्पना सांगितली, सुरुवातीला माणसाची निसर्गाशी मैत्री होती, पंचतत्त्वांची पूजा व्हायची, 'Unity' चे तत्त्व होते. पुढे माणसाने निसर्गाशी शत्रुत्व धरले, तू पाऊस पाडतोस काय ? मग मी छत्री घेतो, असे 'duality' चे तत्त्व आले. पण आता मात्र मनुष्यप्राण्याला कळून चुकलंय की निसर्ग आपल्या पेक्षा वेगळा नाही आणि म्हणून 'Identity' चे तत्त्व आंगिकारले पाहिजे. पूर्वी घरात बाळाचा जन्म झाला तर नारळाचे झाड लावले जायचे ही निसर्गपूजा !

राजाभाऊंनी सांगितले की ब्रह्मदेशातही वटपौर्णिमा साजरी केली जाते, व वेगळ्या प्रकारे तेथील दंतकथा अशी, की, तिथे असलेल्या एका दांपत्याच्या लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाल्यावर त्यांच्या सुखी संसारावर ब्रह्मदेवही प्रसन्न झाले त्यांना म्हणाले की तुम्ही वर मागून घ्या ! त्या दोघांनी इच्छामरण तर मागितलेच पण आम्हाला पुढील जन्मी स्वर्ग नको, तर पृथ्वीवर संयुक्तपणे वडाच्या झाडाचा जन्म द्यावा असा आशिर्वाद मागीतला ! या झाडावर शेकडो पक्षी आपली घरटी करतील, झाडाखाली मोठा जनसमुदाय विश्रांती घेईल, अशा वटवृक्षाचा जन्म त्यांनी मागितला आणि त्या सुंदर वटवृक्षाची पूजा करण्याकरिता आपण त्याच्या फांद्या तोडतो, काय हा दैवदुर्विलास !

नंतर सन्माननीय श्री.दत्ताजी ताम्हाणे यांनी त्यांच्या खड्या आवाजात काही हृद आठवणी कथन केल्या. काही वर्षापूर्वी ते कोसबाडला गेले होते, तिथे चहापान करताना समोर नजर गेली, तर एक डेरेदार आंब्याचा वृक्ष दृष्टीस पडला. तेव्हा त्यांनी त्या वृक्षाचे कौतुक केले. थोड्या वेळाने श्री. जयंतराव पाटील जेव्हा त्यांना त्या वृक्षाजवळ घेऊन गेले तेव्हा त्यावर एक पाटी होती '१९५२ साली श्री. दत्ताजी ताम्हाणे यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले !' वर त्यांनी मल्लीनाथी केली 'आज मी वडाचा वृक्ष लावला आहे !'

दत्ताजींनी सांगितले की वृषभ राजाने वृक्षांना मित्र मानले, भवभूतीची अनुभूती अशी की वृक्ष त्याला गोष्टी सांगत, दगड त्याच्याशी बोलत, याच गोष्टी पुढे वर्डसवर्थच्या कवितेतही येतात.

त्यांची एक आठवण अशी की पूर्वी एकदा दौऱ्यावर गेले असता त्यांनी पाहिले की ६ महिन्यांची एक मुलगी रांगत झोपडीतून बाहेर पडली व एक पिवळाजर्द नाग तिने मुठीत धरला. आई घाबरली पण ओरडणार कसे ? नागाने घाबरुन दंश केला तर ? पण नागराज मजेत होते ! ते तिच्या मुठीतून सुळकन जायचे व बाहेर पडायचे, परत यायचे मुठीत शिरायचे. शेवटी आजूबाजूच्या बायकांनी टाळ्या वाजवल्या व नागराज आरामात निघून गेले. तात्पर्य निसर्ग आपला मित्र आहे, त्याच्याशी मैत्री करा.

पूर्वी दौऱ्यावर असताना कोणीतरी वटपौर्णिमेवर व्याख्यान देण्याचा आग्रह धरला. दत्ताजींनी विचार केला की व्याख्यानाला खेड्यांतून स्त्रिया येत नाहीत, कीर्तनाला येतात. म्हणून सातत्याने ३ वर्षे त्यांनी वटपौर्णिमेवर कीर्तन केले.

अशा या थोर माणसाने लोकांना अवाहन केले की तुम्ही निसर्गाच्या सान्निध्यात या ! हरियालीने तुमच्याकरिता खूप मोठी सोय केली आहे. तिचा लाभ घ्या असे सांगत त्यांनी समारंभाची सांगता केली.

असा हा निसर्गपूजेचा आगळावेगळा कार्यक्रम, निसर्गाच्या संगतीत, निसर्गप्रेमींनी साजरा केला.

**डॉ. माधुरी पेजावर**
प्राणिशास्त्र विभाग प्रमुख,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
चेंदणी, ठाणे - ४०० ६०१.

•••

# नियतकालिकातील साहित्य - एक चिंतन

**श्री. रविंद्र मांजरेकर**

*(काळाच्या ओघात मागणी तसा पुरवठा या न्यायाने सर्व साहित्याचा व नियतकालिकांचा दर्जा बदलत चालला आहे. श्री. मांजरेकर यांनी त्याबाबत केलेले प्रकट चिंतन - संपादक)*

प्रत्यक्ष जीवनाप्रमाणे माणसे साहित्यातून लाभलेले संदर्भ घेऊन जगत असतात. असे संदर्भ पुरवण्याचे काम नियतकालिके करतात. परंतु अलिकडच्या काळातील नियतकालिके पाहिली, वाचली तर त्यातील साहित्याच्या सुमार दर्जाविषयी चिंता वाटते.

''जे प्रकाशन एकाच शीर्षकाखाली किमान एक आठवड्याच्या किंवा त्याहून अधिक कालावधीने सामान्यतः नियमितपणे प्रसिद्ध होते आणि ज्यात अनेक लेखकांचे विविध विषयांवरचे किंवा एका विशिष्ट विषयावरचे साहित्य संकलित केलेले असते, ते नियतकालिक होय.''

प्रकाशनकालानुरूप साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, षण्मासिक आणि वार्षिक असे, तर विशिष्ट वाचक वर्गानुरूप मुलांचे, स्त्रियांचे आणि आशयानुरूप मनोरंजनात्मक, वैचारिक, संशोधनात्मक अशा प्रकारे नियतकालिकांचे वर्गीकरण करता येते.

समाजाच्या सांस्कृतिक जडण घडणीत महत्वाचे अंग मानल्या जाणाऱ्या नियतकालिकांची उज्ज्वल परंपरा महाराष्ट्राला गेल्या शतकापासून लाभली आहे. मातृभाषा आणि स्वदेशबांधवांची सेवा त्याचप्रमाणे महाराष्ट्रात जन्म घेतल्याचे सार्थक करावे या हेतूने १८९५ साली काशिनाथ रघुनाथ मित्र (आजगावकर) यांनी सुरु केलेले 'मनोरंजन' हे मराठीतले पहिले नियतकालिक होय! १९व्या शतकात महाराष्ट्रात सांस्कृतिक प्रबोधनाची एक लाट आली, या प्रबोधनाचे प्रभावी साधन म्हणून नियतकालिके सुरू झाली. या काळात अनेक विषयांचा अभ्यासपूर्ण परामर्श घेणारी आणि प्रदीर्घकाळ मराठी भाषेची सेवा करणारी जी नियतकालिके झाली त्यात विविधज्ञान विस्तार, वऱ्हाडशालापत्रक, निबंधचंद्रिका, ज्ञानोदय, सृष्टिज्ञान, मासिक मनोरंजन, किर्लोस्कर अशी वैशिष्ट्यपूर्ण नियतकालिके महत्त्वाची ठरतात. स्त्री, गृहिणी, प्रपंच, मानिनी, अबलामित्र ही स्त्रियांची, आनंद, खेळगडी, चांदोबा, कुमार, किशोर ही मुलांसाठीची आणि वाङ्मयासंदर्भात प्रतिभा, रत्नाकर अभिरूची, जोत्स्ना पारिजात, सत्यकथा, साहित्य, आलोचना आणि ललित या नियतकालिकांचा उल्लेख अनिवार्य ठरतो.

वृत्तपत्रे ही नियतकालिके आहेत का? याविषयी प्रवाद आहेत, परंतु मराठी विश्वकोशाचा संदर्भ घेता वृत्तपत्रे नियतकालिकात मोडत नाहीत. दैनिकांचा मुख्य हेतू स्थानिक, देशांतर्गत आणि जागतिक पातळीवरील घटना बातमी स्वरूपात तावडतोब पुरवणे हा असतो. काही वृत्तपत्रांचे अग्रलेख हे वाङ्मयीन दृष्ट्या उच्च दर्जाचे असू शकतात, असे टिळक, आगरकर, शि.म. परांजपे इत्यादींचे होते, परंतु आज मात्र अशा लिखाणाची काही सन्माननीय अपवाद वगळता उणीव भासते. अलिकडे अनेक वृत्तपत्रे पुरवण्या देतात. त्यात थोड्याफार प्रमाणात साहित्यिक लिखाण आढळते. परंतु बहुतांश पुरवण्या ह्या राजकीय घटनांचे चर्वितचर्वण करण्यासाठी आणि जाहिराती यासाठीच असतात. त्यातील एखादा लेख आपण वाचला आणि त्यातून काही काळ का होईना पण साहित्यिक अनुभव मिळाला असे सहसा घडत नाही. त्यामुळे ह्या पुरवण्या - साहित्य न ठरता 'पान-पूरके' ठरत आहेत. म्हणूनच यथार्थपणे म्हटले गेले आहे 'वृत्तपत्र म्हणजे क्षणाचे वाङ्मय आणि अनंतकालाची रद्दी असते.'

वृत्तपत्रांप्रमाणे बातम्या न देता ज्ञानवर्धक व मनोरंजक मजकूर जी प्रकाशने नियमित कालावधीने पुरवतात त्यांनाच नियतकालिके ही संज्ञा आहे. वाचकाच्या मनातील विचार साहित्याच्या माध्यमातून उतरवून त्याला जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन देणे हे नियतकालिकांचे मुख्य कार्य होय! कोणत्याही अधांतरी पोकळीत साहित्य तयार होत नाही, ती समाजाशी संबंधित कलाकृती आहे. जीवनातील अनुभवांची मालिका आहे. मुळात जे 'जीवनाशी सहित' जाते ते साहित्य होय. जो पर्यंत साहित्य व्यक्तीच्या अंतरंगाशी समरस होत नाही, तोपर्यंत त्या कलाकृतीला पूर्णत्व येत नाही. कलात्मक अनुभवाने जीवन समृद्ध करण्याचे सामर्थ्य साहित्यामध्ये असावे लागते.

साधारणपणे १९७५ च्या पुढचा काल नियतकालिकांच्या दृष्टीने अतिशय वाईट ठरला. दिवाळी अंकामध्ये संख्यात्मक वाढ झाली. पण साहित्याचा दर्जा घसरला. बहुतेक सर्व नियतकालिकांमधून येणाऱ्या बहुतांश कथा ह्या इतक्या अर्थशून्य असतात की वाचल्यावर उगीचच वाचनाचे श्रम घेतले असे वाटते. यापूर्वी नियतकालिकांतील साहित्याला दर्जा होता, जुने अंक चाळल्यावर दर्जेदार मजकूर जास्त आणि उगीचच औषधाला २-४ जाहिराती दिसत. हल्लीचे फारच थोडे लिखाण साहित्य या पदवीला पोहोचू शकेल. दिवाळी अंकाबाबत देखील हीच परिस्थिती आहे. अनेकदा लिखाण हीन, ओंगळ, अभिरुचिशून्य असे आढळते, केवळ ते खपते म्हणून तसे लिखाण मिळवायचे आणि छापायचे असा व्यापारी हिशेब त्यामागे असतो. खपेल ते छापण्यापेक्षा टिकेल ते छापणं हा संपादकाचा आदर्श बाणा सोयिस्कररित्या विसरला गेला. चांगल्या लिखाणाने वाचकाचे उद्बोधन होते, पण अशा वाईट लिखाणाने त्याचे अध:पतन होते.

साहित्य दुय्यम मानून जाहिरातींना प्राथमिकता देण्याची पोटभरूवृत्ती निर्माण झाली आहे. आधी पोटोबा, मग विठोबा या उक्तीप्रमाणे आधी अर्थकारण मग साहित्यकारण ही वृत्ती वाढीस लागली आहे. म्हणूनच मग नियकालिकांमध्ये कविता जाहिरातीच्या पसाऱ्यात अंग चोरून उभ्या असतात. साहित्य निर्मिती होत नाही असे मुळीच नाही, पण या अशा अपमानकारक वागणुकीमुळे कोठला कवी आपली दर्जेदार कविता प्रसिद्धीसाठी देईल. काही चित्रपट हे जसे गर्दी खेचणारे असतात पण त्यांना दर्दी हजर असतीलच असे नाही, त्याचप्रमाणे अधिक खपाचे दिवाळी अंक Quality न पाहता Quantity पहातात. त्यातील लिखाण लोकप्रिय असते पण साहित्याचा दर्जा मात्र शून्य असतो. कारण त्यात रुची अनेकांना असते, पण अभिरुची फार क्वचित आढळते. मुळात संबंध जीवन व्यवहारात साहित्याचे स्थान काय आहे, या प्रश्नाशी हा मुद्दा निगडित आहे. साहित्यिकांचा समाजाला काय उपयोग आहे असे विचारणारे महाभाग आपण पहातो आहोत. अभिजात लेखकाच्या लिखाणापेक्षा नव साहित्यिकांच्या लिखाणावर प्रेम करणारे आपण पहातो, केशवसुतांच्या कवितेपेक्षा चारोळ्यांवर जीव ओवाळून टाकणारे कमी नाहीत. थोडक्यात समाजाच्या गरजा, आवडी निवडी बदलल्या आणि त्यांचा परिणाम साहित्यावर झाला नसता तरच नवल वाटले असतो, कारण साहित्य हा समाजजीवनाचा आरसा आहे.

प्रतिष्ठा म्हणून T.V., V.C.R घेणाऱ्यांना वाचावेसे वाटत नाही, वाचन ही मूलभूत गरज आहे हे मानणारी माणसे आज फार कमी आहेत. आपल्या दैनंदिन जीवनातून जसे वाचनच गायब होत आहे तसे नियतकालिकांमधून साहित्य गायब होण्याचे आश्चर्य वाटत नाही.

त्यातही साहित्य म्हणजे विकतचे दुखणे आहे. कोठल्याही गोष्टी जशाच्या तशा व स्वीकारताना त्यावर विचार करून निर्णय घ्यायला साहित्य शिकवते, म्हणूनच साहित्य नको असते. आपल्याकडे प्रत्येक गोष्टीत संकुचितपणा येऊ पहात आहे. साहित्यही त्यापासून वंचित नाही. सबंध साहित्यव्यवहार मूठभरांच्या वर्तुळात मर्यादित झाला आहे. साहित्याकडे केवळ करमणूक म्हणून पाहिले जाते आहे. शिक्षणाचा सर्वदूर प्रसार करणारी अनेक नियतकालिके बंद पडली आहेत. ज्या नियतकालिकांचा वाटा महाराष्ट्राची सांस्कृतिक उंची वाढविण्यात होता, अशाही नियतकालिकांतून आज साहित्य गायब झाले आहे. त्यांनी

साहित्य व समाज यातील दरी वाढवली. उपक्रम शीलतेचा चंचू प्रवेश झालाच पाहिजे पण तो परंपरा सांभाळतच.

समाजाच्या बदलत्या गरजांचे प्रतिबिंब लिखाणावर पडले आहे हे मान्य करूनही आजचे दिवाळी अंक, किंवा इतर नियतकालिके यातील लिखाणाला साहित्य म्हणणे म्हणजे मूषकाला ऐरावत म्हणण्यासारखे आहे. आज अनेक नियतकालिके ही भांडवलदारांच्या दावणीला बांधलेली आहेत. त्यांचा डोळा फक्त जाहिरातीतून मिळणाऱ्या लक्ष्मीवर आहे. तिचीच ते पूजा करतात. साहित्य सरस्वतीची आराधना त्यांनी करावी अशी अपेक्षा कशी करावी? साहित्याची ही अवहेलना माझ्याच नव्हे तर इतरी मराठी सारस्वत मनांनाही पटत नाही आणि त्यातूनच याविषयी चिंता उत्पन्न होते. समाजातील विचारवंतांनी साहित्यिकांना योग्य मार्गदर्शन करण्याची हीच वेळ आहे.

**श्री. रविंद्र मांजरेकर**
'स्मृती', भारत को. ऑप. सोसायटी,
सत्यम कलेक्शन जवळ, विष्णुनगर,
ठाणे - ४०० ६०२.

## ऑगस्ट - ठाणे

ठाणे शहरातील ऑगस्ट महिन्यालाही इतिहासात एक वेगळे महत्त्व आहे. एकतर १९४२च्या लढ्यात स्वातंत्र्यपूर्व काळातील कितीतरी तरुणांचा सहभाग होताच, शिवाय याच महिन्यात ठाण्यातील जनतेपर्यंत पोहचणारी ३ वृत्तपत्रे सुरू झाली. प्रतियोगी हे साप्ताहिक वृत्तपत्र होते. ते याच महिन्यात सुरू झालेले. ते आज बंद आहे. परंतु १ ऑगस्ट ९९ ला आपले ५०वे वर्ष पूर्ण करणारे व दैनिक स्वरूपात प्रकाशित होत असणारे 'सन्मित्र' हे याच महिन्यातले. या शिवाय आणिबाणीच्या काळातही मोठ्या आशा ठेऊन सुरू झालेले 'ठाणे वैभव' हे दैनिकही याच महिन्यातले. (२५ ऑगस्ट ७५)

• • •

## सहवेदना

आमच्या कला वाणिज्य महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक व अकौंटन्सी चे विभाग प्रमुख [redacted] शिरुळी सर, तसेच ग्रंथालयीन परिचर लहु वामन पनगले अचानक इहलोक सोडून गेले. आमच्या शिक्षण संस्थांच्या व दिशाच्या वतीने त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

# शिक्षणाचे माध्यम : इंग्रजी की मराठी?

सौ. मंजिरी वा. दांडेकर

*(शिक्षणाचे माध्यम हा पालकांना कोड्यात टाकणारा, कित्येकदा सामाजिक विचार प्रवाहांना बळी पडून चुकीचा निर्णय घ्यायला लावणारा महत्त्वाचा प्रश्न. या दृष्टीने या लेखातील विचार मार्गदर्शक ठरतील असे आहेत - संपादक)*

जीवनाचे अंतिम ध्येय मिळवण्याचे साधन म्हणजे शिक्षण ! 'विद्या विमोक्षय विभाति केवला' असे रामगीतेमध्ये सांगितले आहे. याचा अर्थ असा की विमोक्ष म्हणजे अक्षय सुख हे जीवनाचे अंतिम ध्येय. ते प्राप्त करून देण्यास विद्या किंवा शिक्षण समर्थ आहे. शिक्षणाने व ज्ञानाने व्यक्तीला मनुष्यपण येते. तिचा आणि समाजाचा उत्कर्ष शिक्षणाने होतो. सुसंस्कृत आणि अभिरूचीपूर्ण जीवन जगण्याचे सामर्थ्य शिक्षणानेच मिळते.

हे शिक्षण कोणत्या माध्यमातून घ्यावे? भारत हा बहुभाषिक देश आहे. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमाविषयी पक्का निश्चय हवा. शिक्षण कोणत्या माध्यमातून घ्यायचे याचा विचार करायचा नाही म्हणजे पायाशिवाय इमारत बांधण्यासारखे आहे.

आपल्याकडे शिक्षणशास्त्राबाबत या मुद्याविषयी दोन भूमिका आहेत. एकाचे म्हणणे असे की शिक्षण हे मातृभाषेतूनच असावे तर दुसऱ्यांचे म्हणणे असे की शिक्षण हे इंग्रजी माध्यमातून असावे. आपल्याकडे आधुनिक शिक्षण इंग्रजीतून सुरू झाले त्यामुळे साहजिकच सर्वांचा ओढा या माध्यमाकडे वळला.

खरं म्हणजे जीवनाचा अर्थ समजावून देणारं ते शिक्षण. शिक्षण घेणे म्हणजे पदवी प्राप्त करणे अशा आशयाची संकुचित वृत्ती किंवा कल्पना सर्वत्रच फैलावलेली दिसते. हे उच्च शिक्षण इंग्रजी माध्यमातून असते. खरं तर एकंदर शिक्षणक्रम कसा असावा? त्यातील भाषा किती असाव्यात? त्यांची स्थाने, त्यांचा अभ्यासक्रम इ. अनेक विषयांवर विचार व्हायला हवा. शिक्षणामध्ये भाषा किती असाव्यात याबद्दलही मते वेगळी आहेत. या प्रश्नाचा संबंध अखिल भारताशी असला तरी प्रत्येक राज्याने स्वत:पुरता निर्णय घ्यायला हरकत नाही. हे ठरवताना काही प्रश्न पुढे येतील, पण तेही सोडविता येतील. भाषेचा प्रश्न हा आपल्या समाजाशी, संस्कृतीशी जोडला आहे. त्यामुळे किती भाषा शिकवाव्या किंवा कशा शिकवाव्या या पेक्षा शिक्षण कुठल्या भाषेतून घ्यावे हा मुद्दा महत्त्वाचा.

इंग्रज गेले पण आपली संस्कृती आणि भाषेचे भूत आपल्या मानेवर ठेवून गेले. वर म्हटल्याप्रमाणे इंग्रजी माध्यमातून शिकल्याने आपल्या पाल्याला उच्च शिक्षण घेताना त्रास पडणार नाही, त्या भाषेवर प्रभुत्व मिळेल व इतर चारचौघात तो धीटपणे बोलू शकेल असे काही पालकांना वाटते. त्यामुळे वरवरच्या भपक्याला भुलून हे पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात. हे स्तोम फक्त मध्यम वर्गा पुरतेच नाही तर कनिष्ठ वर्गातही, जेथे मातृभाषेचे धड ज्ञान नाही, तेथेही आहे. इंग्रजी शाळेत जाणारा आपला पाल्य रॅट, मॅट, कॅट घोकायला लागला की भाकरीचे पीठ मळणाऱ्या आईला धन्य वाटते.

दिवसेंदिवस मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊन इंग्रजी माध्यमाच्या शाळा भू छत्रांप्रमाणे वाढत आहेत हा आमचा दैवदुर्विलास. कारण

पालकांना आपल्या पाल्याचे हित कळत नाही. आज शेक्सपिअरची नाटके तोंडपाठ असतील पण आचार्य अत्रे, रा. ग. गडकरी यांच्या सारखे नाटककार माहीत नसतात.

भाषेचा विकास म्हणजे ती भाषा बोलणारांचा विकास असतो, हे आम्हाला कधी उमगलेच नाही. कोणतीही भाषा ही बोलणाऱ्यांच्या रूपानेच सजीव असते. आणि त्यांच्या रूपानेच ती संपन्न होते. इंग्रजांची इंग्रजी भाषा साऱ्या जगात प्रबळ झाली कारण दुसऱ्या महायुद्धाच्या काळापर्यंत इंग्रज अर्ध्या जगाचे अधिकारी होते. हे स्थान महाराष्ट्रात मराठीला कधी मिळेल? महाराष्ट्रीयांनी मराठीची जोपासना व वाढ केली पाहिजे. आपली मातृभाषा किंवा समाजभाषा आपल्या संस्कृतीच्या समृद्धीचे साधन असते. यासाठी आपण मराठीची अभिवृद्धी केली पाहिजे. शालेय अभ्यासाचे माध्यम हे मातृभाषा ठेवून तेच पुढेही ठेवायला हवे. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास मदत होईल. अर्थात त्या त्या विषयांची पाठ्यपुस्तके मातृभाषेतून तयार करावी लागतील. ही जबाबदारी त्या त्या विद्यापीठांची व अभ्यास मंडळांची असेल.

## मातृभाषा

मातृभाषा ही आपल्या सर्वांगीण विकासाचे साधन असते. आपण सदैव आपल्या मातृभाषेत विचार करतो. आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण मातृभाषेचाच उपयोग करतो. आपल्या समाजाचे सारे साहित्य, सारी संस्कृती, मातृभाषेतच असते. ज्ञानग्रहण हे मातृभाषेतून व्हावे याबद्दल दुमत नाही. कारण बालक आधी ऐकते, मग बोलते, आधी बघते मग वाचते, लिहिते. या साठी त्याला मातृभाषा हे उत्तम साधन आहे. कारण घरातही तीच भाषा बोलली जाते. मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण हे सहज व सुलभ रीतीने होते. 'बा बा ब्लॅक शीप' पेक्षा 'बकासुर ओरडला अल डुर्र, भीमाने मारला भुरका भुर्र' यासारखी गाणी अर्थासह, हावभावासह (काही वेळा हावभाव न शिकवताही) चटकन आत्मसात होतात. त्याचा आनंद ही बालके लुटू शकतात.

भाषा ही ज्ञानाचे माध्यम आणि साधन असते. समाजाचे सारे ज्ञानाचे धन त्या त्या समाजाची भाषाच राखून ठेवते. यादृष्टीने आपण महाराष्ट्रीयांनी मराठीचाच आग्रह धरायला हवा. इतर राज्यात स्थायी असलेल्यांनी त्या त्या राज्याच्या भाषेलाच अग्रस्थान दिले. पण महाराष्ट्रात मात्र मराठीची पीछेहाट चालू आहे. याला कारण आपणच आहोत. तेव्हा आपणच मराठी भाषा टिकवून ठेवायला हवी, तिला अग्रस्थान मिळावे यासाठी आग्रह धरायला हवा.

परकीय भाषा शिकू नये असे नाही, तर आधी मातृभाषेतून पाया पक्का करा मग परकीय भाषा शिका असे मी म्हणेन. कारण परकीय भाषेतून शिकताना मुलांवर खूप ताण पडतो व शिक्षण पूर्ण करण्यास वेळही खूप लागतो. याऐवजी मातृभाषेतून शिक्षण घेतले तर वेळ व शक्ती यांची बचत होईल असे म. गांधी म्हणतात.

असतो मा सद्‌गमय। तमसो मा ज्योतिर्गमय।
मृत्योऽर्मा अमृतम् गमय।

या बोधवाक्याचा पाठपुरावा शिक्षणात दिसत नाही. आजचे इंग्रजी माध्यमातील शिक्षण म्हणजे निव्वळ घोकंपट्टी आकलन कमी, 'घोका आणि ओका' या पद्धतीने भारंभार गुण मिळवायचे, उत्तीर्ण व्हायचे, नोकरी मिळवायची, बस्स, झाले जीवनाचे सार्थक ! शिक्षण घेणे म्हणजे पदवी प्राप्त करणे अशा आशयाची संकुचित वृत्ती किंवा कल्पना सर्वत्रच फैलावलेली दिसते.

इंग्रजांच्या अमदानीत इंग्रजीला महत्त्व होते. इंग्रजांना भरपूर कारकुनांची गरज होती. त्यांनी ती भागवून घेतली. श्रेष्ठ निबंधकार व सुधारक श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे वाघिणीचे दूध म्हणजे यशवंतरावांची ज्ञानभाषा. आपली

मातृभाषा समृद्ध करून तिला ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त करून देण्याचे काम इथल्या बुद्धिवंतांचे आहे. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही लिखित घटनेत मातृभाषेच्याच माध्यमाची आखणी केली होती. इंग्रजी माध्यमातील शिक्षणामुळे धीटपणा येतो पण त्यातील आकलनात अधिक शक्ती व बुद्धी खर्च होते. शिक्षण तज्ञ, शिक्षणप्रेमी आचार्य विनोबा भावे, म. गांधी यांनीही मातृभाषेचाच विचार शिक्षणासाठी ग्राह्य मानला. निरनिराळ्या तत्त्ववेत्यांनी निरनिराळी तत्त्वे, विचार मांडले (मातृभाषेतील शिक्षणाबाबत) पण ते केवळ पुस्तकात किंवा राहिले.

आजच्या शिक्षणपद्धतीबद्दल बोलताना प्रसिद्ध इंग्रज शिक्षणतज्ज्ञ लॉर्ड मेकॉले म्हणतात, ''आज आम्हाला भारतीयांचा असा एक वर्ग निर्माण करायचा आहे की ते फक्त वर्णाने आणि रक्ताने भारतीय असतील, पण त्यांच्या आवडी निवडी, प्रवृत्ती व बुद्धी इंग्रजांसारखी असेल.'' अगदी आजही आमची भिस्त परदेशात आपले विद्वान पाठवून तेथील शिक्षणक्षेत्रातून आणलेल्या उधार उसनवार योजनांवरच चालते.

**थोरांचे विचार**

होमर या इंग्लिश तत्त्ववेत्याच्या शब्दात सांगायच झालं तर, 'जेव्हा कुणी गुलामगिरी पत्करतो तेव्हाच त्याचे निम्मे गुण त्याला सोडून जातात. स्वाभिमान हा त्या निघून जाणाऱ्या गुणसमुदायाचा म्होरक्या असतो.' या इंग्रजांना आम्ही आमचा देश स्वाभिमान १५० वर्षांच्या गुलामगिरीत बहुतांशी विकला. आमचा देश सोडवला पण स्वाभिमान आणि आमची भाषा गहाण टाकली. यावर स्वा. सावरकर म्हणाले, 'स्वधर्म, स्वभाषा व स्वदेश याबाबत तडजोड नसावी.' २२ नोव्हें, १९०४ च्या केसरीच्या अग्रलेखात लो. टिळक म्हणतात, 'आमच्या सुशिक्षित लोकांस मराठी वाचनही कमीपणाचे वाटते. सर्व विषयांचे ज्ञान इंग्रजी भाषेतून मिळविण्याच्या सवयीने मराठी भाषा परकी वाटू लागली आहे. हा दोष उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या आमच्या लोकांच्या नादानपणाचा आहे. मराठीचा अभिमान बाळगून तिची अभिवृद्धी करणे हे आपले कर्तव्य आहे, हे जोपर्यंत वाटत नाही तोपर्यंत मराठी वाढणे दूर, पण टिकणेही अशक्य!' दुर्दैवाने आजही तीच स्थिती आहे. मराठीची पीछेहाट सर्वत्र दिसते.

आपले जीवन हे माती, मातृभूमी, मातृभाषा या तीन बिंदूंनी बनलेला त्रिकोण आहे. माती जन्म देते, अन्न देते, मातृभूमी आसरा देते, मातृभाषा जन्मापासून आपल्याला संस्कारांचे बाळकडू पाजत असते. अनुभवाचे बोल आपल्याला शिकवते. हीच आपली मातृभाषा आपण अंगिकारली नाही तर इतर कितीही भाषा आपण बोललो तरी आपले आयुष्य समृद्ध होईल का?

मराठीतून शिक्षण घेणं म्हणजे आज मागासलेपणा समजला जातो. जरी जगातील ज्ञानांचा खजिना इंग्रजी भाषेत असला तरीसुद्धा स्वभाषेतून, स्वकर्तृत्वाने आपण काही मिळवू शकतो हे रशिया, जपान, जर्मनी या राष्ट्रांनी सिद्ध केले आहे. पाश्चिमात्य व पौर्वात्य संस्कृती यांचा समन्वय साधायचा असेल तर आपली संस्कृती, आपली भाषा आपण जपली पाहिजे. सर विन्स्टन चर्चिल म्हणत, 'मी एकाच गुन्ह्याबद्दल मुलाला शिक्षा करीन, तो म्हणजे त्याला मातृभाषा न येणं.' म्हणूनच म्हणावेसे वाटते,

**माय मराठी**

नमस्काराला प्रत्युत्तर, हॅलो हाय,
हाऊ आर यू ? वरं नाय
मराठी लोपत चालली
इंग्रजी रूजत चालली
आधी वंदावी माय, ही आमची संस्कृती
पण अंधानुकरणाने मूढ झाली मती

देशस्वातंत्र्यासाठी मानवी आत्मा निसर्गतःच तळमळत, तडफडत असतो - मोतीलाल नेहरू

आम्हाला हवा साहेबी थाट
म्हणून सरकवला बुडाखालचा पाट
मुलांना इंग्रजी शाळेत घातले
जीवनाचे सार्थक झाले
'बा बा ब्लॅक शीप, दॅटस् इट'
'शुभं करोति' 'व्हॉट इज इट?
'पाढे परवचा' आय डोन्ट नो
'जॅक अँड जिल' 'शल आय नो
बाला आता म्हणावे काय?
कसं थांबवायच कळंतच नाय
त्याच्यासाठी करायचं काय?
एखादा वसा सांगता काय?
ऊतू नको मातू नको
घेतला वसा टाकू नको
आपल्या मुलांना मराठी शिकवा
मराठी वाचा, मराठी जगवा
ज्ञानाची दारे खुली होतील
मुले खूप मोठी होतील.
(सदर कविता स्वरचित आहे.)

**सौ. मंजिरी मा. दांडेकर**
(कलाशिक्षिका)
डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा. वि.)

• • •

### विनम्र स्मरण

श्रेष्ठ कवी व नोबेल पुरस्कार विजेते गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांची ७ ऑगस्ट रोजी पुण्यतिथी ! त्या निमित्ताने त्यांचे हे शब्दस्मरण.

विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर ही माझी
प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दुःखतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचं
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही,
दुःखावर जय मिळवता यावा
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये
एवढीच माझी इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं
एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावंस ही माझी प्रार्थना नाही,
तरुन जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सांत्वन केलं नाहीस तर माझी
तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दुःखाच्या रात्री सारं जग
जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा.

- रवींद्रनाथ टागोर

# कविकुलगुरू कालिदास आणि प्रेम

श्री. अरविंद दोडे

*(संस्कृत साहित्याला विलक्षण समृद्ध करणारा महाकवी कालिदास याच्या आठवणींसाठी गेल्याच महिन्यात कालिदास दिन (आषाढ शुद्ध प्रतिपदा) साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने कालिदासाच्या साहित्यातील प्रेम भावनेचे हे वैभव, किंचित लालित्याकडे झुकणारे वर्णन! - संपादक)*

कालिदासाच्या, साहित्याचा स्थायी भाव 'प्रणय' आहे. तो प्रणयही निकोप आहे. केविलवाणा नाही. प्रणयात शारीरिक आकर्षणाचा भाग येतो. तो जीवनप्रेरणेचाच एक भाग असतो. पण आसक्ती अखेर ममता-वात्सल्यात परिणत होते, हेच कालिदासाचं सामर्थ्य आहे. तो श्रृंगाराचा राजा आहे. त्याच्या दोन महाकाव्यांचा व तीन नाटकांचा विषय प्रणय हाच आहे. कालिदासानं रंगवलेले प्रेम हे एक भारतीय परम नीतिमूल्य आहे!

**काल**

जगातल्या अनेक श्रेष्ठ कलावंतांचा काळ ठरविणं कठीण असल्याचं लक्षात येतं. प्राचीन परंपरेला अनुसरून कालिदास ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात होऊन गेला, असं मानतात. शककर्ता विक्रमादित्य राजा याच्या पदरी असलेल्या नवरत्नांपैकी तो एक होता. या राजाने इ.स. पूर्व ५७ मध्ये आपल्या नावाचा विक्रमसंवत सुरू केला. उज्जयिनी ही त्याची राजधानी असून कालिदासाचं वास्तव्यही या नगरीत होतं. काही विद्वान म्हणतात, द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्य इ.स. ३८० ते ४१३ या कालखंडात राज्यावर असताना कालिदास चवथ्या शतकाच्या शेवटी व पाचव्या शतकाच्या आरंभी झाला असला पाहिजे. त्याच्या काळाप्रमाणे स्थलाबाबतही अशीच मतांतरे आहेत. मध्यप्रदेश व काश्मीर इथंच त्याचं वसतिस्थान असावं. त्याच्या बद्दलच्या अनेक आख्यायिका सर्वश्रुत आहेतच. तो मोठा विनोदी, विनयसंपन्न, निरलस आणि वत्सल असावा. त्याचं आयुष्य फार थोर लोकांच्या सहवासात अन् संपन्न अवस्थेत गेल्यामुळे दीन, दरिद्री आणि दुर्बळ अशा लोकांचा त्यानं आपल्या काव्यात आत्मीयतेनं विचार केलेला दिसत नाही. एकूण जीवनातील सर्व सुखांचा पूर्ण उपभोग घेतला असावा, असं दिसतं.

कालिदासाची प्रत्येक कृती त्यागप्रधान प्रेमाची प्रतिष्ठा सांगणारी आहे. त्याग आणि तपस्या यांच्याशिवाय कोणतीच गोष्ट उज्ज्वल होऊ शकत नाही. जीवनाची ध्येयभूत पण कठोर आध्यात्मिकता त्यानं काव्याच्या मखरात वसवून आस्वादनीय केली आहे. तप, तपोवन आणि त्याग ही जणू त्याची आदर्शत्रयीच आहे!

**प्रणय**

कालिदासासारखे सौंदर्योपासक हे मनोजगतात काय किंवा दृश्य जगतात काय, नेहमीच 'प्रवासी' असतात. कालिदासाचं मन आयुष्याला रम्य, उदात्त स्वरूप प्राप्त करून देऊ शकेल, अशा आदर्श प्रणयाच्या चिंतनात निमग्न झालं होतं. एका राजकन्येशी त्याचा विवाह झाला होता, अशी आख्यायिका आहे. स्वतः विक्रमादित्याच्या बहिणीला उद्देशून त्यानं 'मेघदूत' हे महाकाव्य लिहिलं, असंही म्हटले जातं. खरं खोटं, काली माताच जाणे! त्याचं मन हे नेहमीच भूतकालीन आदर्श प्रेमाच्या चिंतनात तल्लीन झालेलं दिसतं. रोमांच, रूदन, स्मित, प्रलाप यांचाच प्रणयभ्रांत मनाला प्रत्यक्ष लाभ होतो. केव्हा? तर सौंदर्योपासक भ्रांत कवींना व्यवहारात प्रत्यक्ष लाभ उठवावासा वाटतो, तेव्हा! पण या वस्तुस्थितीचं निमित्त करून प्रेमिकांचा उपहास करणाऱ्यांना उर्दू शायर 'जोश' मलिहाबादीनं उत्तर दिलंय-

'इश्क मे कहते हैं
कि हैरान हो जाते हैं।
यह नहीं कहते कि
इनसान हो जाते हैं ॥'

---

ज्या राष्ट्रात शहीदांना सन्मान दिला जातो, ती राष्ट्रे आपला सन्मान व स्वातंत्र्य अबाधित राखू शकतात

अर्थात, प्रणयचिंतनाने माणूस उद्भ्रांत होतो, असं सगळेच सांगतात. हे शहाणे असं नाही सांगत की, त्यामुळेच त्याला मानव्य प्राप्त होते. कौटुंबिक आयुष्याचं सुख अटळ ठेऊन तडजोड करावी आणि इतरांसह आपलं हित साधावं अशी प्रापंचिक, व्यवहारिक दृष्टी कालिदासाची आहे. हे कसं जमलंय त्याला? नायकाला नैतिक मूल्यांचा अधिकाधिक आदर आहे. कुणा सुंदरीच्या प्रेमात ते पडतात. प्रेमाची अनिवार ओढ म्हणून असं प्रेम करताना ते नायक कुणाही रूपवतीच्या नादी लागत नाहीत. इतर स्त्रियांबद्दल आत्यंतिक आदर ते दाखवतात. दुष्यंत राजा शकुंतलेस ओळखत नाही तेव्हा, ती परस्त्री आहे, हे जाणून (शापामुळे विस्मरण झाल्यानं, ती त्याची पत्नी असूनही) आदर दाखवतो. तसच लोकांत वा एकान्तातही हे नायक पत्नीचा अवमान करीत नाहीत. स्त्रीचा मान राखला जावा. तिला न्याय मिळावा, असा कालिदासाचा प्रयत्न आपल्या लक्षात येतो.

निष्फळ भोग सुविचारी माणसाला फार काळ धुंदीत ठेऊ शकत नाहीत. मग विरहयातनांचा अर्थ लावायचा कसा? कालिदासाच्या चित्रणात आणि बहुपत्नीत्वाच्या पार्श्वभूमीवर, नायकाच्या विरहव्यथा ह्या त्यांच्या शाश्वत प्रेमाचं नायिकेला मिळालेलं आश्वासन आहे. 'अजा' चे इंदुमतीवरील प्रेम इतकं उत्कट आहे की, तिच्याशिवाय जगणं अशक्य आहे. तो आत्महत्या करतो. पुरुषाच्या असामान्य पत्नीप्रेमाची ही साक्ष कालिदासानं नमूद केली आहे. उर्वशीच्या वियोगानं वेडा झालेला पुरूरवा, त्याचं प्रेम तिला कळल्यावरच त्याचं पुनर्मिलन हा एक पवित्रमंगल उत्सव ठरतो! शकुंतला-दुष्यंताच्या पुनर्मिलनात स्त्री-जीवनाची विषमता अन् तिच्यावर होणारा सामाजिक अन्याय यांचं परिमार्जन आहे.

प्रदीर्घ वियोगानंतर एकत्र आलेल्या पति-पत्नीचं पुनर्मीलन स्वर्गीय म्हणावं लागेल. विरहानं प्रेमाचा कस लागतो. उत्कटता वाढते. प्रेमिक एकमेकांना यथार्थपणे जाणू शकतात. तेव्हाची ओढ शारीरिक न राहता, त्याला अवघ्या जीवनाची भक्कम बैठक लाभते. ते खरे 'सहचर' ठरतात. या विशाल जाणिवेमुळे शारीरिक प्रेम संपून जातं असं नाही. त्या प्रेमाला प्रगाढ जिव्हाळ्याची घनता येते. प्रेमाची उत्कटता आणि स्थिरता कसोटीला लागून जाणिवेच्या कक्षा विशाल होणं हा प्रेमाचा आणि वियोगाचा अर्थ आहे!

आध्यात्मिक प्रेमात परिवर्तनवादी भूमिकेत प्रेमाचा शारीरिक म्हणून धिक्कार असल्याचं दिसतं तर आसक्त अनुरक्त जिवाचं शुद्धीकरण करण्याची आवश्यकता त्यानं सांगितलेली आहे. संस्कृत तात्त्विक साहित्यातली प्रधानधारा ही निवृत्तीची मोक्षपर उपदेशाची आहे. जीवनावर निष्ठा ठेऊन ललित साहित्यानं चारही पुरुषार्थांचा मार्ग मोकळा केला. प्रवृत्तीच्या मार्गानं जीवनाच्या आनंदाचा झरा सतत जिवंत ठेवला.

### प्रेमाची व्याप्ती

प्रेमाची व्याप्ती जीवनाइतकीच व्यापक आहे. आयुष्यातलं वैविध्य प्रेमात प्रतिबिंबित झाल्याशिवाय राहत नाही. वडिलांचं वात्सल्य आणि आईची माया हा सुद्धा प्रेमाचाच एक भाग आहे. ह्यातूनच खरं जीवनसाफल्य प्रचीतीस येतं. कालिदासाचे नायक म्हणूनच अपत्यहीन असून त्यांची अंतर्वेदना आपल्या साहित्यात त्यानं रंगवली आहे. अपत्याच्या प्रेमानं महर्षी कण्वांसारखा तापस मुनीही वत्सल पिता बनतो. अपत्यप्रेमाचा आईचा आनंद शब्दातीत असतो. मुलीचा सांभाळ करणं ही मातेच्या जीवनाची 'लागणी' असते. पुत्राचा पराक्रम हा तिचा अभिमान असतो. शकुंतलेस टाकून देणारी मेनका, दुष्यंतानं तिचा अव्हेर केल्यावर शकुंतलेच्या संकटकाळात स्वर्गातून धावून येते. तिला आपल्यासोबत नेते. अपत्यप्रेमाची ही शिकवण येते कुठून? मानवी जीवनाचे कुठलेही नियम लागू नसलेली अप्सरा उर्वशी 'आयू' ला पाहताच गहिवरते. तिला आपोआप पान्हा फुटतो.

मित्राच्या नि:स्वार्थ प्रेमाचं दर्शन कालिदासाच्या सूचक वाक्यांवरुन लक्षात येतं. शकुंतलेच्या मैत्रिणी - प्रियवंदा व अनसूया, उर्वशीची सखी चित्रलेखा, मालविकाची मैत्रीण बकुळा, तसंच राजेलोकांचे सेवक विदूषक... वगैरे पात्रं लक्षात राहतात. मदनासाठी विलाप करणारी रती रेखाटताना, कालिदासाचं सुभाषित वाचायला

मिळतं अन् मित्रप्रेमाची कल्पना येते. 'पुरुषाचं स्त्रीवरील प्रेम अस्थिर असू शकतं. पण मित्रप्रेम अचल असतं.' असं हे मित्रप्रेमाचं तत्त्व!

मीलनाकडे नेणारं पहिलं प्रेम, नव्या अनुभूतीची थरार प्रत्ययास आणून देते. साफल्याच्या क्षणापर्यंत मन हे संशय, निराशा, हेवा, हूरहूर, वेदना अशा अनेक अनुभवांतून भिरभिरते. विवाहपूर्व प्रीतीचं चित्र मोठं सुखावह असतं, हेच खरं! पति पत्नीच्या हृदयाचं मीलन म्हणजे त्याचं अद्वैत. पत्नी केवळ गृहिणी राहते का? नाही. ती सखी होते. जीवनाचं सुकाणू चालवणारी सचिव होते. तिच्या राज्यात ती स्वामिनी असते. मैत्रीचं नातं कोणत्याही भेदाच्या पलीकडचं असावं. तेव्हाच पतिपत्नी एका पातळीवर येतात. स्त्रीवर होणाऱ्या सामाजिक अन्यायावर कालिदासाचं हे एक कलात्मक उत्तर आहे. परस्पर प्रीतीच्या जीवनात खरी लोकशाही असते. साम्यवाद असतो.

कालिदासाची मालविका भोळी-भाबडी आहे.मनापासून प्रेम करावं, एवढंच तिला ठाऊक! शकुंतलेचा सद्गुरु साक्षात निसर्गराजा. म्हणून तिच्यात दिसते निर्भयता... अन् विलक्षण सहनशीलता. सीता म्हणजे पृथ्वीच्या सोशिकतेचं सगुण रूप. इंदुमतीची चोखंदळ जीवनदृष्टी, पार्वतीचं प्रणयसामर्थ्य, उर्वशीची उत्कट आसक्ती.

**प्रेमाच्या छटा**

कालिदासानं रंगवलेल्या मानवी प्रेमाच्या अशा असंख्य छटा आहेत. त्यात कौटुंबिक जीवनाची मुग्धता आहे अन् दाम्पत्यप्रेमाची स्निग्धताही आहे. स्वर्गातील, स्वप्नरम्यता आहे. हिमालयाची भव्यता, परमेश्वरासारखी पवित्रता आहे. आश्रमासारखी निरागसता आणि अभय, शांतता आहे. दोन जीवांच्या मीलनतला उन्मादक आवेग आहे.. आणि या साऱ्यांवर मात करणारी सजणारी 'निवृत्ती' आहे.

कालिदासाच्या कलाकृतीत स्त्री-पुरुष प्रेमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अबाधित स्थान आहे. त्यानं प्रेमाला तुच्छतेनं हीन रीतीनं कुठंही रंगवलेलं नाही. त्यानं अवघा निसर्ग आणि सर्व जीवसृष्टी प्रेमाच्या धाग्यानं बांधलेली आहे. म्हणूनच 'मेघदूता'त तो म्हणतो, मेघाचा विजेपासून वियोग होऊ नये.

त्याच्या शब्दांत प्रीतीचं तत्त्वज्ञान रसरसून आलं आहे. प्रकृती-पुरुषाची ही ओढ निसर्गाची धर्मिकता आहे. रती हा जीवनाचा स्थायीभाव आहे, संभोग हा निसर्गाचा विलास आहे - आणि नव-निर्मितीच्या दृष्टीने कर्तव्याचा भाग आहे. 'कुमार-संभवा'त शिव हा पार्वतीस प्रथम भेटतो, तिची तपःश्चर्या पाहून. 'अथ तवास्मि दासः' असं प्रेमाचं आश्वासन देतो.

स्त्री-पुरुषांची प्रीती केवळ शारीरिक सुखाची पूर्ती नाही. सृजनाबरोबर सामर्थ्य देणारी ती उर्मी आहे. आयुष्य व्यापणारी जीवनाची त्रिमिती दाखवणारी कोणती भावना असते?

प्रणयाची! हा प्रणयच स्त्रीला पुरुषाहून मोठं करतो. पृथ्वीचं औदार्य देतो.सहनशील बनवतो, हाच प्रणय पुरुषाच्या पराक्रमाची स्फूर्ती ठरतो. प्रीती ही स्वार्थातून परार्थाकडे, द्वैताकडून अद्वैताकडे नेणारी शक्ती आहे. प्रीती ही स्वतःला हरवून टाकणारी किमया आहे. दुजेपणाचा भाव मिटवणारी आहे.. आणि भक्तीचा तरी अर्थ काय? रती व भक्ती यांच्यात कलात्मक विरोध नसल्याने दोहोंचा आनंद बेभान करणारा असतो. प्रीतीची धुंद नशा दाखवूनही कालिदासानं अतिरेक कुठंही केलेला नाही. अपत्य ही कौटुंबिक जीवनाची कृतार्थता, आसक्तीमधून वात्सल्य फुललं नाही तर जीवन अपूर्ण राहतं, असं कालिदासाचं मत आहे. जीवनाचा समतोलतेनं उपभोग घ्यावा, हाच तात्त्विक निष्ठेचा पाया असावा. कालिदासाचं प्रेमाचं तत्त्वज्ञान याच पायावर भक्कमपणे उभं आहे. जीवनाच्या सर्व अवस्थांचा उत्कट अनुभव आणि आनंद हे कालिदासाच्या साहित्याचं रूप आहे. ह्यात प्रेमाचा अव्हेर नाही, स्वीकार आहे. अनुभवांना नकार नाही, होकार आहे. जीवनाचा आनंद भरभरून लुटणारा माणूसच खरा कलावंत ठरतो. नवनिर्मिती करू शकतो आणि त्याच सृजनातून परमार्थही साधू शकतो. दोन प्रेमिकांपैकी एकाला दुसऱ्याविषयी (पान

(पान क्रमांक ३२ वर)

# असं व्हायला नको होतं !

**सौ. गिताली इंगवले**

*(तरुण वयातील प्रेम भावना हा अस्वस्थ बातम्यांमुळे सदैव मनात रेंगाळणारा विषय. त्या दृष्टीने आमच्या तंत्रनिकेतनातील सौ. गीताली इंगवले यांचे हे मुक्त चिंतन - संपादक)*

वर्तमानपत्रातील मजकूर वाचता वाचता माझी नजर त्या बातमीवर खिळली आणि मन एकदम सुन्न झाले.... तिच्या... त्या कोवळ्या तरुणीवर तिच्या प्रियकराने चॉपरने सपासप वार केले... आणि इस्पितळात नेता नेताच तिचा मृत्यू झाला... ह्या आणि अशा सारख्या कितीतरी बातम्या आजकाल आपण वर्तमानपत्रात वाचतो. आजकाल म्हणण्याचा उद्देश एवढाच की पूर्वी अशा बातम्यांचे प्रमाण फार कमी होते आणि आता ते फारच वाढले आहे. ही बाब फारच गंभीर आहे आणि समाजाने ह्यावर फार विचार करून त्यातून मार्ग काढण्याची फार आवश्यकता आहे.

रिंकू पाटील, अमृता देशपांडे, कल्पना जोशी... ह्या अगदी कोवळ्या तरुणी.. पण त्यांचा शेवट फारच भयावह होता.. एकतर्फी प्रेमाचा किंवा आणखीन काही.. ह्या सगळ्या गोष्टींचा परिणाम त्यांना इतक्या लहान वयात भोगावा लागला ही फार दुर्दैवाची गोष्ट आहे. फुलायच्या, उमलायच्या वयात कोणीतरी आघात करून त्यांना ह्या जगातून कायमचे नष्ट केले. ही मानसिकता ही विकृती ही जन्माला येते, फोफावते आणि शेवट करते..

शाळा कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुली कोणते ध्येय ठेऊन जगत असतात हेच मुळी कळत नाही. ज्या हे ध्येय ठेऊन जगतात त्याच खंबीर रहातात आणि त्यांच्या नशीबी असा दुर्दैवी अंत येत नाही. आई वडिलांचे ऋण हे कर्ज मानून त्यांनी केलेल्या त्यागाची किंमत लक्षात ठेऊन पुढील मार्गक्रमणा करतात. त्याच उत्तम नागरिक होऊन मानाचे स्थान प्राप्त करतात. ही वाक्ये केवळ मुलींसाठीच नव्हे तर मुलांसाठी सुद्धा आहे. मुलांमध्ये सुद्धा आत्महत्येचे प्रमाण वाढले गेले आहे ह्याचे कारण म्हणजे त्यांची भरकटलेली वृत्ती, दुर्बल मनोबल.. आणि खोट्या स्वप्नाळू दुनियेला मोहणारी वृत्ती.

ज्या वयात नेटाने अभ्यास करायचा असतो त्या वयात ही मुलं मुली प्रेम करतात... त्यात उत्कटता ही केवळ बाह्यरूपाची असते. तिथे मनावर प्रेम करण्याचे गणित नसते. काही कालावधीतच ह्या प्रेमाच्या भरतीला ओहोटी लागते.. ते आटते.. हे जर एकतर्फी आटले तर दुसरी व्यक्ती सूडापोटी काहीही करते... अगदी भर बाजारात... भर रस्त्यात.. जीव पण घेते आणि अगदी शांत डोक्याने सांगते, 'तिने माझा विश्वासघात केला...' सिनेमामध्ये कसे विश्वासघात केल्यावर नायक सूडाने पेटतो तसा हा सूडाने पेटतो आणि पुढचा मागचा विचार न करता तो तिचा जीव घेतो. हे सगळं लिहायला, वाचायला सोपे आहे पण त्यावर नियंत्रण ठेवणे फार कठीण आहे. जर हे आटोक्यात आणावयाचे असेल तर त्याची सुरुवात घरापासूनच केली पाहिजे... पालकांनी अगदी काही गोष्टी काटेकोर पणाने पाळल्या पाहिजेत... घरातील वातावरण खेळीमेळीचे आणि त्याबरोबरच शिस्तीचे पाहिजे. आपण ही गोष्ट केली तर त्याचा जाब आपल्यालाच द्यावा लागणार आहे असा धाक असणे आवश्यक आहे. आई वडीलांच्या कष्टाची जाणीव जर त्यांना नसेल तर त्यांना करून देणे आवश्यक आहे. शाळा कॉलेजमध्ये जाताना आवश्यक तेवढे पैसे द्यावे. अधून मधून आपला पाल्य वेळेवर व नियमित शाळा कॉलेजमध्ये जातो की नाही हे पहाणे... त्याची मानसिकता कशी सुदृढ खंबीर करता येईल हे पहाणे... कुणाशी तरी घरात मन मोकळे करण्याची वृत्ती असणे फार महत्त्वाचे आहे... वरं वाईट

(पान क्रमांक ३०वर)

# स्पर्धा

श्री. संजय गुमास्ते

*(स्पर्धेच्या आजच्या युगात आवश्यक असणाऱ्या काही गुणांचा निर्देश या लेखात आहेत. - संपादक)*

स्पर्धा ही समाजाला सतत गतिशील ठेवणारी एक अद्भुत शक्ती आहे. जीवनातील प्रत्येक क्षण व समाजातील प्रत्येक क्षेत्र विकसित होण्याच्या दृष्टीने स्पर्धा नकळत कारणीभूत होत असते.

स्पर्धा ही माणसाच्या अंगातली एक मूलभूत प्रवृत्तीच आहे. एखादी कृती दुसऱ्यापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे करून दाखवावी या आंतरिक प्रेरणेमधूनच स्पर्धावृत्ती जागृत होते. आपल्या सभोवताली आपल्याला सतत स्पर्धांची असंख्य रूपे पहावयास मिळतात. 'ते मूल बघ कस भराभर चालतंय! तू चालं बघू लवकर!' असे म्हणून बाल्यावस्थेपासूनच बालकाच्या मनात त्याचे पालक स्पर्धावृत्ती निर्माण करतात. त्यायोगाने बालकाच्या अंगभूत गुणांचा विकास होत असो. सुदृढ बालक स्पर्धामुळे तर मूल एक वर्षाचे होण्यापूर्वीच एक स्पर्धक बनू शकते. शालेय जीवनात निबंध, वक्तृत्व, चित्रकला आदि स्पर्धांची ओळख आपल्याला होत असते. आंतरशालेय, महाविद्यालयीन, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय अशा चढत्या श्रेणींच्या स्पर्धेतून माणसाला पुढे येण्याची संधी प्राप्त होते. त्यातूनच एखादा सुनील गावस्कर किंवा तारानाथ शेणॉय आपापल्या क्षेत्रात जागतिक विक्रम गाजवतात.

स्पर्धेमुळे आपणास उत्तेजन मिळते किंवा प्रोत्साहित केले जाते. 'शेजारच्या गोट्याला बघ किती छान मार्क मिळाले! नाहीतर तुला किती मार्क आहेत!' तेव्हा मुलगा मनातल्या मनात डिवचला जातो व गोट्याच्या नाकावर टिच्चून मीसुद्धा अधिक मार्कस् मिळवेन ही ईर्षा त्याच्या मनात निर्माण होते. अशा ईर्षेमुळेच स्पर्धेमधील रंगत वाढत जाते.

गणेशोत्सव, दीपावली किंवा एखाद्या समारंभाच्या निमित्ताने स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामध्ये वेशभूषा, रांगोळी, नाट्यछटा, भक्तिगीत अशा अनेक स्पर्धा पहावयास मिळतात. वेशभूषा, पुष्परचना या स्पर्धांमध्ये कल्पकतेला तर केशभूषा, सौंदर्य स्पर्धा यामध्ये सौंदर्यदृष्टीला महत्व दिले जाते. पाककला स्पर्धेत गृहिणीचे पाककौशल्य पणास लागते. अशा स्पर्धेतूनच 'नाचे मयूरी' चित्रपटातील अपंग 'मयूरी' किंवा तारानाथ शेणॉयसारखा 'अपंग जलतरणपटू' आपल्या अपंगत्वावर मात करून निर्माण होऊ शकतात.

संगीत, नृत्य, गायन यासारख्या कलाक्षेत्रात कलेच्या एकेरी अविष्कारापेक्षा त्याची जुगलबंदीच स्पर्धेची रंगत अधिक वाढवते. स्पर्धक तोडीस तोड असेल तर प्रेक्षकही रंगून जातात. अशा स्पर्धा स्पर्धकाबरोबरच परीक्षकाचीही कसोटी घेतात, व अनेकदा बरोबरीने सोडवाव्या लागतात. जेवढे अधिक स्पर्धक सहभागी होतात तेवढी निर्णयाची उत्सुकता वाढते. मात्र केवळ अधिक स्पर्धक अधिक रंगत आणतात असे नाही, तर प्रतिस्पर्धी जेवढा आधिक तुल्यबळ तेवढी स्पर्धा अधिक रंगत जाते. असामान्य बुद्धिमत्तेच्या शंभर विद्यार्थ्यांमध्ये प्रथम येणे अधिक स्पृहणीय ठरते. अशा वेळेस बुद्धीचा कस लागतो. जुळ्या बहिणीसारख्या दिसणाऱ्या मायलेकींची स्पर्धा तिच्या वेगळेपणामुळे निराळीच गंमत निर्माण करते. अनेक महिला मंडळे अशा विविध स्पर्धांचे आयोजन उत्कृष्टरित्या करीत असतात.त्यास सर्व जमातीकडून प्रतिसादही भरपूर मिळतो.

स्पर्धेचे अंतिम यश कुणाच्याही पदरी पडो, यशापेक्षा त्यात सहभागी होण्याच्या धाडसीपणाला अधिक महत्त्व असते. स्पर्धा खिलाडू वृत्तीने खेळली गेली तरच आनंद निर्माण करते. याउलट मत्सर, हेवा व सूड बुद्धीचा अंतर्भाव झाला तर मात्र कटुता निर्माण होते. विजेत्या संघाचे अभिनंदन जेव्हा पराभूत संघ करतो तेव्हा तेथे खिलाडूवृत्तीचा प्रत्यय येतो. स्पर्धेमुळे कधी कधी मनुष्याच्या संकुचित मनाचेही दर्शन घडते.

---

ज्या दुर्गुणांमुळे पारतंत्र्य आले ते नाहीसे झाले की आपण स्वतंत्र म्हणून समजा - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

स्पर्धा लहान असो वा मोठी असो, तिची लज्जत सारखीच असते. घराघरातून मुलामुलींनी लावलेल्या भेंड्यांच्या स्पर्धा ज्या ओढीने रंगतात तीच चढाओढ ऑलिम्पिक स्पर्धेच्या अंतिम फेरीपर्यंत पहावयास मिळते. खेळाडू कधी-कधी आपला आधीचा विक्रम स्वतःच मोडण्याचा प्रयत्न करतो. ही स्वतःच स्वतःशी लावलेली स्पर्धा नव्हे काय?

स्पर्धा केवळ कला-क्रीडा क्षेत्रातच चालते असे नव्हे, तर तिने प्रत्येक क्षेत्र व्यापले आहे. व्यापार उद्योगात तर जबरदस्त स्पर्धा आपणास दिसून येतात. आकाशवाणी, दूरदर्शन, बॅनर्स आदि माध्यमाद्वारे जाहिराती करून एक प्रकारे स्पर्धाच आपणास पहावयास मिळत असते.

आजच्या झंझावती स्पर्धा युगात उभे राहण्यासाठी आत्मविश्वास, अभिजात गुण, चिकाटी प्रयत्न आदींची गरज असते. स्पर्धेमुळे स्पर्धकांचे गुण दृष्टिक्षेपात येतात. तीन कलावंत, खेळाडू एवढेच नव्हे तर अनेक यंत्राचा शोधही स्पर्धेमुळेच लागतो. दुसऱ्याच्या यंत्रापेक्षा माझ्या कंपनीचे यंत्र अधिक उठावदार बनविणे यातच स्पर्धा लपली आहे.

पृथ्वीतलावरील स्पर्धा अपुरी पडते म्हणून की काय मानवाने अवकाशातील ग्रहताऱ्यांवर स्वार होऊन एक प्रकारे निराळीच स्पर्धा सुरू केली आहे.

स्पर्धा कोणत्याही क्षेत्रात, कोठेही, कधीही होऊ शकते हे जरी खरे असले तरी सर्वशक्तीमान परमेश्वर ही एक शक्ती अशी आहे की ज्या शक्तीबरोबर मानव कधीही स्पर्धा करू शकत नाही - नव्हे शकणार नाही. म्हणूनच हा स्पर्धक परमेश्वरापुढे नकळत म्हणतो 'तेथे कर माझे जुळती!'

संजय गुमास्ते
४-७/०२५, केदार बिल्डिंग,
लोकपुरम, ठाणे - ५
दूरध्वनी : ५३४ ०३६५

•••

(पान क्रमांक २८वरून)

**असं व्हायला नको होतं !**

कळण्याइतकी सुदृढता येणे ही एकदम होणारी क्रिया नाही पण हळूहळू ती निश्चितच होते... शाळा.. कॉलेजमध्ये जाताना मुलींचे कपडे व्यवस्थित असणे... त्यांना साधेपणा शिकविणे फार महत्त्वाचे आहे... ह्या आणि अशा गोष्टी जर शिकवल्या नाहीत तर मनाची घालमेल करायला, काहीतरी प्रवृत्त करायला, कारणीभूत होतात. वर नमूद केलेल्या मुली ह्या मध्यमवर्गीय कुटुंबातील होत्या. त्यांचं प्रेमही होत... नंतर ते प्रेम एकतर्फी प्रेमात रूपांतरित होत गेले... प्रेमाच्या दिवसात त्याने त्याची ऐपत नसताना सुद्धा पुष्कळ पैसे खर्च केलेले असतात.. तिला ह्या गोष्टी आवडलेल्या सुद्धा असतात मग परिस्थितीचा चटका लागतो... तो भानावर येतो... तिच्या घरच्या व्यक्तींनी त्यांच्या प्रेमावर घेतलेला आक्षेप... आणि त्याच्यातूनच निर्माण झालेली अशी बिकट समस्या.. की तिला दुसरीच व्यक्ती आवडू लागते... ही आणि अशी कितीतरी गुंतागुंत...

या मुलामुलींना प्रेमाची व्याख्याच कळलेली नाही. जे मन फक्त बाह्यआकर्षणाला भुलते.. जे मन खंबीर नसते.. जे मन स्थिर नसते अशा मनावर प्रेम करून शेवटी निराशाच पदरी पडते.. केवळ त्या मुलामुलींच्या पदरीच नव्हे तर त्यांच्या कुटुंबांच्या पदरी घोर निराशा आणि स्वप्नांच्या चुराडा होतो... शेवटी रहातो तिचा भिंतीवर टांगलेला फोटो आणि त्याच्या वर घातलेला नाजूक फुलांचा हार... तिच्या आठवणी... आणि शेवटी राहून राहून हा विचार येतो... असं व्हायला नको होते...!!!

सौ. गितांली इंगवले
९, दीपदर्शन, घंटाळी, ठाणे.

•••

# छंद माझा आगळा

श्री. अशोक मुळ्ये

*(नारळाच्या करवंटी पासून उपयुक्त, देखण्या वस्तू बनविणे हा छंद वेगळा खराच, पण या वस्तू पहाताच मोह ही निर्माण करणारा. म्हणूनच श्री. मुळ्ये यांचा लेख येथे देत आहोत. त्यापासून काहींना प्रेरणा मिळावी ही अपेक्षा! - संपादक)*

माझे बरेचसे बालपण आणि शालेय जीवन खेडेगावातच गेले. १९५९ साली मी एस्.एस्.सी. (तत्कालीन अकरावी) झालो. त्यावेळी अभ्यासाव्यतिरिक्त मुलांसाठी व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने काही स्पर्धा वगैरे गोष्टी नव्हत्या. एकतर तो काळ मुलाने अमुक एक ध्येयच गाठले पाहिजे असे वाटणाऱ्या पालकांचा नव्हता. शिवाय व्यक्तिमत्त्व विकास या सारखी काही वेगळी संकल्पना नव्हती, सहाजिकच त्यासाठी कोणत्याही खास सोयी उपलब्ध करून दिलेल्या नव्हत्या. सामान्यपणे विद्यार्थी दशेत स्टॅम्प जमवणे, जुनी नाणी जमवणे या सारखे छंद ही अगदी प्राथमिक अवस्थेतच होते.

आम्ही भावंडे विटीदांडू, बागेमध्ये खड्डा खणून त्यात पाणी ओतून विहीर बनवून त्यावर सुपारीच्या पोगीची मोट बनवणे असे खेळ खेळत असू व त्याकरिता लागणाऱ्या वस्तू स्वतःच बनवत असू. त्या काळात मला भविष्यात एखादा आगळावेगळा छंद जडेल त्याची प्रदर्शने होतील त्यातून प्रसिद्धी मिळेल असे स्वप्नात देखील खरे वाटले नसते.

माझा हा आगळा वेगळा छंद म्हणजे नारळाच्या कवचापासून वस्तू बनवणे हा आहे. (करवंटी असा उल्लेख टाळण्याची दोन कारणे आहेत एक म्हणजे सबंध नारळ मी हवा तसा कापून घेतो, फोडत नाही आणि दुसरे म्हणजे करवंटी म्हटल्यावर फारसे चांगले भाव मनात येत नाहीत.) मी आजतागायत सुमारे १५० वस्तू बनविल्या आहेत, शिवाय नव-नवीन वस्तू तयार करणे सुरूच आहे. या वस्तूंची २४ प्रदर्शने झाली आहेत शिवाय या संदर्भात विविध मराठी, हिंदी व इंग्रजी नियतकालीकातून सुमारे १० मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत.

या छंदाची सुरूवात १९७१ साली झाली. आमचे पूर्वाश्रमीचे शेजारी श्री. ज.रा.कुलकर्णी यांच्या घरी नारळापासून बनवलेले भांडे पाहिले आणि माझ्या मनात या गोष्टीविषयी उत्सुकता निर्माण झाली. ते भांडे मला खूप आवडले. नंतर २/३ दिवसातच मी तसे भांडे बनवले. त्यापूर्वी मी काही लाकडी वस्तू बनवल्या होत्या त्यामुळे तो अनुभवही गाठीशी होताच.

या छंदास अनेकांनी प्रोत्साहन दिले व कौतुक केले. या संदर्भातली माझी पहिली मुलाखत श्री. मुजफ्फर हुसेन यांनी घेतली त्यानंतर दूरदर्शनवरील दिशा दर्शन मध्ये 'दिशा कलेची' या कार्यक्रमांतर्गत कु. जयश्री दळवी हिने मुलाखत घेतली. माझे कुटुंबीय, स्नेही यांच्या वारंवार प्रोत्साहनामुळेच मला ही वाटचाल करणे शक्य झाले. विविध ठिकाणच्या प्रदर्शनात मला अनेक प्रकारचे अनुभव मिळाले, त्यापैकी काही प्रातिनिधिक अनुभव मी येथे मांडतो.

कुर्ला येथे शिवसृष्टीमध्ये झालेल्या प्रदर्शनात 'मनी प्लांट' ठेवण्यासाठी बनवलेले नारळाचे भांडे विक्रीला ठेवले होते. त्याची किंमत अवघी १० रुपये होती. एका सद्गृहस्थास ही किंमत ऐकल्यावर आश्चर्य वाटले. ते म्हणाले "तुम्ही या भांड्याची किंमत किती कमी ठेवली आहे! हेच भांडे जर एखाद्या चांगल्या दुकानात असते तर कमीत कमी २५ ते ४० रुपये पडले असते? ते गृहस्थ एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी २५ रुपये देऊन ते भांडे खरेदी केले. सर्वसाधारणपणे किंमत कमी करून मागण्याच्या आजच्या काळात ही घटना आगळी वेगळीच आहे.

दुसऱ्या प्रदर्शनात नारळाच्या कवचापासून बनवलेली एक चष्म्याची फ्रेम ठेवली होती. ती विक्रीसाठी

नव्हती. पण एका लहान मुलीने तिच्या वडलांजवळ त्या फ्रेमसाठी हट्ट केला तेव्हा मी ती फ्रेम अपवाद म्हणून विकली.

बँकेतील प्रदर्शनात एका महिलेने कुंकवाचा करंडा त्यांच्यासाठी राखून ठेवण्यास सांगितला. माझ्या बँकेतील एका अधिकाऱ्याने तर मी बनवलेल्या छोट्या पादुका (खडावा) त्यांच्या पूजेत ठेवून रोज पूजा करण्यास सुरुवात केली. आपण केलेली एखादी वस्तू ही देवासमान पूजली जाते ही गोष्ट मनाला निश्चितच आनंद देणारी आहे.

अशाच एका आनंदाच्या क्षणामध्ये - रेवदंडा हायस्कूल येथील प्रदर्शनातील अभिप्रायाचा समावेश आहे. तत्कालीन शिक्षणमंत्री श्री. कमलकिशोर कदम यांनी लिहिले ''येथील वस्तू पाहिल्यानंतर कलाकाराला कुठलेही माध्यम चालतं याची खात्री पटली.'' एकूणच या छंदामुळे मला भरपूर प्रसिद्धी मिळाली याच छंदामुळे १० वर्ष कलाकार असण्याची अट पूर्ण झाली आणि मला बेलापूर ''आर्टिस्ट व्हिलेज'' मधील जागा मिळाली.

हा छंद म्हणजे माझ्यासाठी 'सर्वोत्कृष्ट विरंगुळा' आहे. या संदर्भात एक सुविचार माझ्या वाचनात आला होता. "If some time you do not get lost, it is possible that you may never find your way."

यापुढे हा छंद अधिक जोमाने जोपासण्याचा माझा संकल्प आहे. अनेक वस्तूंची संकल्पना डोक्यात आहे. ती प्रत्यक्षात उतरवायची आहे. स्वस्थ बसणे हे मनाला पटणारच नाही, त्याबाबतीत विवेकानंदाचे वाक्य मनावर ठसलेलं आहे. विवेकानंद म्हणतात ''गंजून संपण्यापेक्षा झिजून संपणे अधिक चांगले.''

**श्री. अशोक मुळ्ये**
५/१५, आर्टिस्ट व्हिलेज, सेक्टर ८, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४. दूरध्वनी : ७५७ ५२५१.

•••

(पान क्रमांक २७ वरून)

**कविकुलगुरु कालिदास आणि प्रेम**

अनिवार ओढ असेल, पण दुसऱ्याला नसेल तर? अशा व्यक्तींचं वैवाहिक मीलन झालं तरी समाधान अन् शांती लाभेल का? दोन व्यक्तींचं परस्परांवर समान, उत्कट प्रेम असेल तर? त्यांना परस्परांची प्राप्ती न होता निराशेनं मरण आलं तरी हरकत नाही, असं अग्निमित्राच्या तोंडी कालिदासानं आपलं मत व्यक्त केलं आहे. सारांश, पुरुषानं आपली लहर, विकार किंवा अधिकार यांना वश न होता स्त्रीच्या प्रतिसादाची, तिच्या खुशीची प्रतिक्षा करावी. तोपर्यंत साफल्यपूर्व मानसिक यातना सोसाव्यात, हेच कलात्मक सत्य आहे!

**श्री. अरविन्द दोडे**
शालन, भोईरवाडी, खोपट
ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी : ४१४ ७७०५

•••

# 'न्यायमंदिरात लोकमान्य टिळक'

## टिळक विचाराकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोण

प्रा. मोहन पाठक

लोकमान्य टिळकांच्या जीवनावर चरित्रात्मक, राजकीय कामगिरीचे मूल्यमापन करणारी अशी असंख्य पुस्तके मराठीत लिहिली गेली. परंतु त्यांच्या जीवनातील न्यायालयांमध्ये जाण्याचे जे प्रसंग आले, त्या खटल्यांच्या उत्तरादाखल त्यांनी जो तार्किक विचारमंथनाचा भाग व्यक्त केला त्यावर वेगळे पुस्तक अद्याप वाचनात नव्हते. टिळकांचे निकटचे सहकारी कै. दत्तात्रय बेळवी यांचे नातू श्री. श्रीनिवास बेळवी यांनी न्याय मंदिरात लोकमान्य टिळक हे पुस्तक लिहून ही उणीव दूर करण्याचा एक उल्लेखनीय प्रयत्न केला आहे.

या पुस्तकाचे प्रकाशन १ ऑगस्ट ९८ रोजी भारताचे गृहमंत्री माननीय लालकृष्ण आडवाणी यांच्या हस्ते पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात झाले. या पुस्तकात लोकमान्यांवर झालेल्या पाच फौजदारी व तीन दिवाणी दाव्यांची इत्थंभूत माहिती अभ्यासपूर्ण रीतीने मांडण्यात आली आहे. या खटल्यांच्या सुनावणीत आपली बाजू मांडताना टिळकांनी केलेले युक्तिवाद, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दिसून येणारे पैलू, त्यांचा कायद्याचा अभ्यास या सर्वांचे चौफेर अवगाहन करून श्री. बेळवी यांनी या छोट्या पुस्तकात माहिती दिली आहे.

त्यांच्यावरील सर्व खटल्यांच्या तपशीलाचा भाग (खटला, त्याची तारीख इ.) पहिल्याच प्रकरणाच्या पहिल्या परिच्छेदात (पृ.११) देऊन श्री. बेळवी यांनी असा प्रश्न निर्माण केला आहे, ''टिळकांना न्यायमंदिरात न्याय मिळाला का?'' व त्याचे नाही हे उत्तरही लगेच दिले आहे.

एकूण ८ खटल्यांची हकिकत यात आहे. ती वाचल्यानंतर एकूणच न्याय व्यवस्थेबद्दल व इंग्रज शासनाबद्दल मनात असणारी चीड उफाळून येते. राजद्रोहाचा दुसरा खटला (प्रकरण ५) यात बेळवी लिहितात, ''टिळकांचे हे बचावाचे भाषण एकवीस तास म्हणजे कोर्टाचे पूर्ण चार दिवस चालले होते किंवा टिळकांच्या मनस्तापास कारणीभूत ठरलेल्या कित्येक खटल्यात जेव्हा निर्णय स्पष्ट असूनही फिरवला गेला हे टिळकांना जाणवले तेव्हा ते म्हणाले, ''जेव्हा दोन्ही बाजूंनी हिंदी असतात तेव्हा ब्रिटिश न्यायसंस्था निःपक्षपाती असते. जेव्हा दोन्ही बाजू ब्रिटिश असतात तेव्हाही ब्रिटीश न्यायसंस्था निःपक्षपाती असते पण जेव्हा एका बाजू हिंदी व दुसरी ब्रिटिश असते तेव्हा मात्र ब्रिटिश न्यायसंस्था निःपक्षपाती राहू शकत नाही.''(पृ.५१)

आपल्याला न्याय नाकारण्यात आला आहे याची जाणीव सामान्य माणसाला होणे व टिळकांना होणे यात खूप फरक आहे. अपेक्षित निकाल लागणे एवढाच सामान्य माणसाचा हेतू असतो. परंतु कायद्याचे सखोल ज्ञान असणारे व इंग्रज सत्तेविरुद्ध प्राणपणाने लढणारे टिळक जेव्हा असे विधान करतात तेव्हा त्याचा अर्थ वेगळा असतो. या उद्गारापूर्वी श्री. बेळवींचे एक वाक्य आहे, ''या निकालाने टिळकांच्या ब्रिटीश न्याय संस्थेवर असलेला निष्ठेला तडा गेला'' हा खटला त्यांच्या उत्तर आयुष्यातला. तत्पूर्वीही त्यांच्यावर खटले झाले पण त्यांची निष्ठा संपली नव्हती. श्री. बेळवी प्रकरणांचा शेवट करताना न्यायमंदिरात टिळकांना न्याय मिळत नाही पण अखेर नैतिक व कायदेशीर विजय सुद्धा टिळकांचाच झाला हे आवर्जून सांगतात.

पुस्तकातील एकूण ११ प्रकरणांपैकी प्रकरण क्रमांक ३ ते ९ यात कालक्रमानुसार सर्व खटल्यांची इत्थंभूत माहिती आली आहे. दुसऱ्या, 'कायदेपंडित टिळक' या प्रकरणात त्यांनी टिळकांच्या कायदेविषयक ज्ञानाची माहिती दिली आहे. पुढील प्रकरणे वाचण्याच्या दृष्टीने हे प्रकरण चांगली पार्श्वभूमी निर्माण करते. दहाव्या प्रकरणात टिळकांच्या या खटल्यातील वकिलांबाबतचे काही योगायोग व या खटल्यांमधील काही योगायोग यांची उपयुक्त माहिती श्री.

वेळवी देतात तर अकराव्या प्रकरणात काही आख्यायिकांचा समावेश करतात.

मधल्या सात प्रकरणात चवॅ प्रकरणापासून (१८८२) ते राम डोहाच्या तिसऱ्या खटल्यापर्यंतची माहिती येते. या असाधारण माणसाच्या जीवनातील पत्नी वियोगाचा क्षण श्री. वेळवी उत्कटतेने टिपतात (पृ.३४) तर मंडाले म्हणजे गीता रहस्य हे समीकरण माहीत असलेल्या सामान्यांसाठी गीतारहस्याचीही थोडक्यात माहिती देतात.

हे पुस्तक अगदी कमी पानांचे असले तरी माहिती मिळण्याच्या दृष्टीने परिपूर्ण झाले आहे. विशेष म्हणजे संदर्भ ग्रंथाची यादीही शेवटी दिली आहे. मराठी लेखकात याबद्दल आढळणारी अनास्था वेळवी यांनी मुळीच दाखविली नाही. अभिप्रायार्थ जयवंतराव टिळक व मुंबई उच्च न्यायालयाने निवृत्त सर न्यायाधीश श्री. वा.न. देशमुख यांच्या प्रतिक्रिया पुस्तकात आहेत. त्यात श्री. देशमुख लिहितात त्यानुसार ''श्री वेळवी यांनी लोकमान्यांच्या जीवन चरित्रावरील साहित्यात मोलाची भर घातली आहे.'' हे अगदी खरे आहे. ही सर्व माहिती देताना त्यात रुक्षपणाचा आढळ कोठेही झालेला नाही. भाषेतील ओघ व माहितीक्षमता ही अशा प्रकारच्या पुस्तकांची मूलभूत गरज असते. तरच ती वाचनीय ठरतात. ही वाचनीयता या पुस्तकात अखेरपर्यंत टिकून आहे. लेखक स्वतः निवृत्त मुख्य न्यायाधीश असल्याने कायद्यावरील अशा प्रकारचे पुस्तक लिहिणे हा त्यांच्या अधिकारच आहे. याच पद्धतीने 'इंग्रजांच्या आमदानीतील गाजलेले खटले' असे पुस्तकही तयार करता येण्यासारखे आहे. श्री वेळवी यांच्या सारख्या तज्ज्ञ माणसाने ते सिद्ध केले तर त्यांचे संदर्भ मूल्य वाढू शकेल.

पुस्तकाचे मुखपृष्ठ कोणी बनविले आहे त्याचा नामोल्लेख पुस्तकात मिळत नाही. मुखपृष्ठ अतिशय अचूक व आकर्षक आहे. कोणताही भडकपणा न येऊ देता कृष्ण धवल रंगातील न्यायालयाचे दृश्य व त्या दृश्यात आपली बाजू मांडणारे टिळक दिसतात. त्या काळातील कृष्णधवल छाया चित्राचा योग्य वापर केला आहे.

सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय? या अग्रलेखाचा उल्लेख, देशाचे दुर्दैव या अग्रलेखाचा उल्लेख ज्युरीने मला दोषी ठरविले असले तरी.... (पृ.३१-३२) हे भाषण इ. सर्व बारीक सारीक तपशील येतात मात्र ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे...'' या गाजलेल्या वाक्याचा उल्लेख (१९०८च्या खटल्यात) मिळत नाही.

लोकमान्य टिळकांचा अभ्यास करण्याचा दृष्टीने त्यांच्या जीवनातील एक तृतीयांश काळ खर्ची पडणारा हा न्यायालयांतील खटल्यांच्या इतिहास खूप उपयोगी ठरणारा आहे.

प्रा. मोहन पाठक, ग्रंथपाल

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

पुस्तक - न्यायमंदिरात लोकमान्य टिळक

लेखक - श्री. श्रीनिवास वेळवी

प्रकाशक - लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्ट, पुणे

प्रकाशन दिनांक - १ ऑगस्ट, १९९८, पृष्ठे ६३

मूल्य - रूपये ५०/- फक्त

• • •

# मनोगत - एका गिर्यारोहकाचे

श्री. प्रदीप म. केळकर

*(प्रयत्नांवर निष्ठा ठेवली तर पंगू माणूसही डोंगर पार करू शकतो. श्री. केळकर यांनी प्रयत्नांच्या दृष्टीने गिर्यारोहणाचा केलेला विचार व अजिंक्य बाण मोहीमेचे वर्णन या दृष्टीने मननीय आहे - संपादक)*

उंच हिमालय, तुमचा आमचा,
अजिंक्य अमुचा सह्याकडा.
गौरीशंकर उभ्या जगाचा,
मनात पूजीन रायगडा !

किल्ले रायगड शिवकालीन साम्राज्यातील छत्रपती शिवरायांची राजधानी. महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या इतिहासाच्या पाऊलखुणा जपणाऱ्या ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार, भूतकाळातील स्फुल्लिंग मनात जागवणारा तसेच आम्हा तरुणांना स्फूर्ती देणारा किल्ले रायगड आजही दिमाखात उभा आहे. या गडाचे पावित्र्य तसेच अनेक गडकोटांचे व किल्ल्यांचे पावित्र्य राखणे हे आम्हा सर्वांचे पवित्र कार्य आहे. अनेक नरवीरांनी किल्ले जिंकताना व राखताना आपल्या छातीचा कोट करून समर्था प्राणांची आहुतीही दिली आहे. त्या रणशार्दूलांची नावे किल्ल्यांवर कधीही कोरली गेली नाहीत. परंतु आजचे चित्र नेमके उलटे आहे. आज पहावे तिकडे आपणास किल्ल्यांची दुर्दशा बघावयास मिळते. ऐतिहासिक वास्तू जतन करण्याऐवजी त्याचा होणारा ऱ्हास पाहून मन विषण्ण होते. किल्ल्यांवर जिकडे पहावे तिकडे किल्ल्याची एकही भिंत सुरक्षित अथवा कोरी दिसत नाही की जिकडे आजच्या विकृत संस्कृतीचे दर्शन तिथे होणार नाही. या सर्व अधोगतीस व ऱ्हासास जबाबदार कोण? गिर्यारोहक, पर्यटक, शासन की समाजातील विकृत अवस्था? हे सर्व कुठेतरी थांबायलाच हवे. त्यासाठी गिर्यारोहकांनी तसेच अनेक संस्थांनीही आपली कंबर कसली आहे. हे सर्व उत्स्फूर्तपणे करत असताना या सर्वांना कुठल्याही फळाची अपेक्षा ठेवली नाही.

विकट वाट वहिवाट करण्याचे काम गिर्यारोहकच करीत असतात. यातून मिळणारा आनंद त्याचे विराटरूप, तसेच पावसाळ्यातील त्याचे तांडव, त्याचबरोबर पावसाळ्यानंतर हिरवा शालू नेसून बसलेल्या एखाद्या



श्री. प्रदीप केळकर

नववधूसारखा दिसणारा निसर्ग, खळाळून फेसाळत कोसळणारे धबधबे, त्याचबरोबर ग्रीष्म ऋतूतील उघडेबोडके दिसणारे गडकोट व गिरीदुर्ग, आपल्या राकटपणाची व भव्यतेची कल्पना देतात. असा हा निसर्गाचा भव्य अविष्कार अपणाऱ्या सह्याद्रीचा वारसा आपण जपला नाही तर आपल्या सारखे करंटे आपणच.

निसर्गाशी सुसंवाद साधण्याची अनेक साधने आहेत. कोणी दऱ्याखोऱ्यात हिंडताना नक्षत्र व तारे यांचा अभ्यास करतात तर कोणी पक्षी निरीक्षणाचा. तर एखादा इतिहासाचा अभ्यासक असतो. प्रत्येकाची संवाद साधण्याची कल्पना वेगवेगळी असते. माझ्यासारख्या काही निसर्गवेड्यांचे (गिर्यारोहकांचे) लक्ष दऱ्याखोऱ्यात फिरताना उंच सुळक्यांवर व कड्यांवर स्थिरावते. मी सुद्धा गेली १६ ते १७ वर्षे अव्याहतपणे प्रस्तरारोहण करीत आहे. अनेक प्रस्तरारोहकांना मार्गदर्शनही केले आहे. प्रस्तरारोहण करीत असताना अनेक अजिंक्य सुळके व कड्यांना गवसणी घातली आहे. या सर्व मोहीमा अनेक बुजुर्ग व नवशिक्यांबरोबर आखून चढाईचा आनंद लुटला आहे. या कामी अनेक संस्थांनीही मला मदत केली आहे. यातील अनेक मोहीमा आजही प्रस्तरारोहण क्षेत्रात तितक्याच आव्हानात्मक राहिल्या आहेत. प्रस्तरारोहण हा खेळ तसा धोकादायक व जोखीमपूर्णच. परंतु तितकाच आव्हानात्मक व साहसी आहे. अलिकडच्या काळात या क्रीडाप्रकाराचा झपाट्याने विकास होत आहे त्यामुळे यातील अपघाताचे प्रमाणही अत्यल्प झाले आहे.

**अजिंक्य बाण मोहीम**

ही कला जोपासताना आम्ही १९८४ साली सह्याद्रीतील धारक व प्रस्तरारोहकांना खुणावणारा अंदाजे ७१० फूटी 'अजिंक्य बाण' मोहीमेस हात घातला. या मोहीमेचे नेतृत्व प्रजापती बोधणे यांनी केले. प्रस्तरारोहणाचे नेतृत्व अर्थातच माझ्याकडे होते. संपूर्ण मोहीमेची नियोजनबद्ध आखणी केली होती. यात प्रमुख तळाची जबाबदारी, तसेच जेवणखाण, पाणी आणण्याची व खाणे पोहचवण्याची जबाबदारी, छायाचित्रण अशी सर्व कामे प्रत्येकाला विभागून दिली होती. ही मोहीम अंदाजे दोन महिने चालू होती. मी स्वतः, प्रजापती व जगन्नाथ राऊळ अशा तिघांनी सुळक्याची पूर्व पहाणी केली होती. पहिल्या दिवशी चढाईचा मार्ग नक्की करून एका मोठ्या गल्लीतून क्रॅक, चिमणी, ब्रिजींग तसेच ओव्हरहँग पार करून मी का मोठ्या लेजवर पोहोचलो. तिथे खिळे व मोठ्या दगडाला दोर घट्ट बांधला. नंतर एक एक सहकाऱ्यांना माझ्यापर्यंत घेतले. कमरेला दोर असुनसुद्धा माझ्यापर्यंत पोहचणे तितके सोपे नव्हते. हे त्यांच्या नंतर लक्षात आले. पुढील मार्गाचा अभ्यास करून मी चढाईस सुरूवात केली. परत दोन तीन खिळे मारल्यानंतर दिवसभराच्या कसदार व आव्हानात्मक चढाईमुळे शारीरिक थकवा जाणवत होता. शरीराच्या हालचाली व्यवस्थित होत नाहीत हे ओळखून मी चढाई आटोपती घेतली व खिळ्याला दोर बांधून खाली उतरलो. या चढाईत मला मदत करणारा अनिल चव्हाण याने मला प्रश्न केला की उर्वरित चढाई तुझ्या मार्गदर्शनाखाली मी करू का? मी तात्काळ त्याच्या जिगरबाजपणाला दाद दिली व संपूर्ण चढाईचा मार्ग व त्यातील बारकावे त्याला समजावून सांगितले. कारण तो पहिल्यांदाच नेतृत्व करत होता. अत्यंत काळजीपूर्वक चढाई करत असतानाच त्याच्या पायाखालील खिळा निघाला व अंदाजे ४० ते ५० फूट खाली डोके वर पाय अशा अवस्थेत आ वासून पाहणाऱ्या दरीकडे तो लटकत होता. प्रसंग मोठा बाका होता. सुळक्याच्या खाली जमलेले गावकरी व गिर्यारोहक अवाक झाले. मी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून सर्वांना विश्वासात घेतले व क्षणाचाही विलंब न करता अनिलपर्यंत त्याच्याच दोरीचा आधार घेऊन पोहचण्यासाठी चढाईस सुरूवात केली. त्याच्यापाशी पोहचल्यावर त्याने बांधलेल्या सीटहार्नेसला धरून एक छोट्या लेजवर त्याला बसवले व हळूहळू त्याला सुखरूप सहकाऱ्यापर्यंत आणले. एवढ्या गंभीर प्रसंगाला अनिलने मोठ्या हिंमतीने तोंड दिले. आम्ही सर्व अनिलला घेऊन बेसकॅम्पवर पोहचलो व अनिल बरा होईपर्यंत आम्ही ही मोहीम आटोपती घेतली.

गिर्यारोहणात अशा अनेक प्रसंगांना कधी कधी आम्हा गिर्यारोहकांना धैर्याने सामोरे जावे लागते. मी सुद्धा अशा प्रसंगांना आपले कौशल्य पणाला लावून काहींना साक्षात मृत्यूच्या काळदाढेतून वाचवले आहे. गिर्यारोहण

व प्रस्तरारोहण ही कला जोपासताना ह्यातून बंधुभाव, सहकार्याची भावना, जिद्द, साहसी वृत्ती, सांघिक भावना असे अनेक गुण अंगी जोपासले जातात. त्याचबरोबर जाज्वल्य देशाभिमान जपणारा व जोपासणारा समाज हा ही गिर्यारोहणातूनच घडत असतो. गिर्यारोहकांनी कितीही उंच कडे, सुळके सर केले अथवा हिमालयातील शिखरे पादाक्रांत केली तरीही निसर्गाच्या भव्यतेपुढे मानव किती खुजा आहे याची जणू साक्षच आपणाला पाहावयास मिळते.

श्री. प्रदीप स. केळकर
(शिवछत्रपती पुरस्कार विजेता)
जीवन छाया ४, राम मारुती रोड,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**जे प्रयत्न करतात**
**ते यशस्वी होतात.**

•••

२५ जुलै १९९९ रोजी विद्या प्रसारक मंडळाची वार्षिक सर्व साधारण सभा डॉ बेडेकर विद्या मंदिरातील विद्यालंकार सभागृहात झाली. त्या सभेत खालील पदाधिकारी व सदस्यांची १९९९-२००० च्या कार्यकारिणी करिता निवड करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | डॉ. वा. ना. बेडेकर |
| उपाध्यक्ष | - | श्री. श्री.वि. करंदीकर |
| कार्याध्यक्ष | - | श्री. अ.धो. टिल्लू |
| कोषाध्यक्ष | - | श्री. मा.य. गोखले |
| कार्यवाह | - | श्री. अु.भा. जोशी |

कार्यकारिणी सदस्य

| | |
|---|---|
| श्री. द.बा. खर्डे | श्री. मा.ना. पाटील |
| श्री. वि.ना. मराठे | श्री. दि.गु. जोशी |
| श्री. ल.ग. देव | डॉ. अ.ना. बापट |

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

२०० आसने, आधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था, वहाने उभी करण्यासाठी प्रशस्य जागा.

संपर्क
कार्यवाह,
विद्याप्रसारक मंडळ, ठाणे.
दूरध्वनी : ५४२ ६२७०

# पावसाळ्यातील ओला चिंब दिवस

**प्रा. मोहन पाठक**

शैक्षणिक वर्षाची सुरुवात नित्याप्रमाणे पावसाळलेल्या दिवसांनी झाली. परिसरात पाऊस क्षणांबरोबर शैक्षणिक वर्षातील विविध उपक्रमांनाही सुरुवात झाली. विविध निकाल, अकरावीच्या व शाळेच्या प्रवेशाची गडबड याचबरोबर नव्या जुन्या चेहऱ्यांची गर्दी वावरायला लागली व नव्या चैतन्याचा नवा अध्याय सुरु झाला. परिसर वार्तासाठी सर्व घटक संस्थांनी अधिक सहकार्य देण्याची गरज आहे. सातत्याने आवाहन करणे चालूच आहे. दिशा या आमच्या नियतकालिकाचा प्रयत्न परिसरातील काही दिशा आणून घेऊन वृत्त रुपाने आपणास समोर आणण्याचा आहे.

दिशा बद्दल अनेक प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. ज्यांनी ज्यांनी प्रतिक्रिया दिल्या त्या सर्वांचे जाहीर आभार. दिशा तर्फे व्यक्त करतो. प्रतिक्रिया नोंदणाऱ्या सर्व वाचकांना गेली तीन वर्षे. मी, दोन ओळी लिहून कळवायची विनंती करीत आलो आहे. वाचकांच्या पत्रांचे सदर चालू करण्याची आमची कल्पना आहे. पण दोन ओळी लिहून कळविण्यातला आळस वा संगणक युगामुळे लेखन क्षमता आटली असल्याने असेल लेखी प्रतिक्रिया कळविणे वाचकांना पसंत नसावे. तरीही विनंती करतो, आपल्या सूचना, मार्गदर्शन यामुळे दिशा चा दर्जा अधिक दर्जेदार होण्यास मदत होईल.

गेल्या महिना भरातील बातम्यांचा वेध -

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.)**

रवि. दि. २५ जुलै ९९ रोजी आकाशवाणीवर सादर झालेल्या 'गीर्वाणभारती' या कार्यक्रमात आमच्या शाळेतील सौ. मीरा लिमये व श्री. दीपक धोंडे यांनी श्री. श्री.बा. मठ लिखित 'यमजेत्री सावित्री' ही संस्कृत नाटिका सादर केली.

ठाणे जिल्हा गणित अध्यापक मंडळाने इ. ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी इ. ५वी, ६वी, ७वी च्या गणित अभ्यासक्रमावर आधारित असे पुस्तक तयार केले आहे. विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या या पुस्तकाच्या लेखक मंडळात आमच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. अ.वि. सहस्रबुद्धे व शाळा. गणित शिक्षिका सौ. अपर्णा भट यांचा समावेश आहे.

श्री. यशवंत नारायण बेलसरे यांचे अमेरिकेतील शिक्षण पद्धती व भारतातील शिक्षण पद्धती या विषयावर शिक्षकांसाठी व्याख्यान झाले. श्री. बेलसरे सध्या अमेरिकेतील शाळेत Computer Science शिकवतात.

११ ऑगस्ट ९९ रोजी होणाऱ्या खग्रास सूर्यग्रहणा संबंधी इ. ८वी व ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी Slide Show आयोजित करण्यात आला.

किंग्ज चेस ॲकॅडमी व ठाणे जिल्हा चेस असो. यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ जुलै ९९ ते ४ जुलै ९९ या काळात आंतरशालेय बुद्धीबळ स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत आमच्या शाळेतील कु. प्रथमेश प्रशांत प्रधान (५अ) यास १० वर्षाखालील मुलांच्या गटात द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. तसेच १५ वर्षाखालील मुलांच्या गटात कु. ऋषिकेश राजन चुंबळे (८अ) यासही द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.

दि. ३ जुलै १९९९ रोजी आमच्या शाळेत 'होप' संस्थेचे पदाधिकारी व शाळेतील शिक्षिका सौ. अंजली पंडित, सौ. वंदना अडसुळे, सौ. उज्ज्वला ताम्हाणे, सौ. उज्ज्वला धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली 'निसर्ग मित्र मंडळाची स्थापना झाली. यात इ.६वी चे विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

---

स्वातंत्र्य मिळायला अनेक वर्षे झगडावे लागले आज स्वातंत्र्यानंतर, ५२ वर्षांनी या अग्रवाईतील अपुरेपणा लक्षात येत आहे.

माध्य. शिष्यवृत्ती परीक्षेत कु. सुयोग संजीव मपारा यास शिष्यवृत्ती प्राप्त होऊन तो जिल्ह्यात ९व्या क्रमांकावर चमकला आहे. त्याला सौ. वंदना अडसुळे व श्रीमती आशा जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

कु. नीता फाटक (९अ) हिने मुंबई आकाशवाणीवर सादर होणाऱ्या बाल दरबार या कार्यक्रमात 'पाऊस' या विषयावर मनोगत सादर केले.

कारगिल येथे शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी शाळेतील विद्यार्थ्यांनी २२,३२०/- रु. चा निधी जमा केला.

विद्यार्थी सहाय्य निधीतून ११ गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात आले.

इ. ९वी मधील ३ विद्यार्थीनींना महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत उत्तम यश मिळाले.

कु. उर्मिला शिंदे हिला राज्या स्तरावरील शिष्यवृत्ती, कु. मेंगळे रिमा व म्हात्रे हर्षदा यांना जिल्हा स्तरावरील शिष्यवृत्ती मिळाली. कुमार भूषण बर्वे यास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे.

### कला वाणिज्य महाविद्यालय

या शैक्षणिक वर्षापासून मुंबई विद्यापीठाच्या तीन वर्षे मुदतीचा बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज हा नवीन अभ्यासक्रम महाविद्यालयाने सुरू केला. ३५ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला.

महाविद्यालयातील तृतीय वर्ष बी.ए. चा निकाल ८५.०७% तर तृतीय वर्ष वाणिज्य शाखेचा निकाल ६२.८९% लागला. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्राचार्य सदाशिव गोखले यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. तृतीय वर्ष कला शाखेच्या परीक्षेस ३३५ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ४० प्रथम श्रेणी, १८२ द्वितीय श्रेणीत तर ६३ उत्तीर्ण श्रेणीत उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेच्या परीक्षेस बसलेल्या ५३९ विद्यार्थ्यांपैकी ९५ जण प्रथम श्रेणीत, १९८ द्वितीय श्रेणीत तर ४६ उत्तीर्ण श्रेणीत उत्तीर्ण झाले.

वर्षाच्या सुरूवातीसच महाविद्यालयातील जुने प्राध्यापक व अकौंटसी विभागाचे प्रमुख श्री. सिंघवी सर यांचे आकस्मिक निधन झाले तसेच ग्रंथालय विभागातील जुने सेवक लहू वामन वनगळे यांचे निधन झाले. श्री. वनगळे उत्तम हस्ताक्षर व गाण्याची आवड यासाठी ओळखले जात. या दोन सहकाऱ्यांचा वियोग ही भरून न येणारी बाब आहे. दोहोंच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत.

### वांदोडकर विज्ञान महाविद्यालय

दिनांक २४ जुलै रोजी बाळकृष्ण नाईक वांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या कलामंडळाच्या उद्घाटनाचा समारंभ आषाढी एकादशीस थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागतपर भाषण कलामंडळाच्या कार्याध्यक्षा प्रा. सौ. सुधा फाटक यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध साहित्यिक रत्नाकर मतकरी होते. 'आकांक्षा' चे उद्घाटनही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कारगिल येथील युद्धात धारातीर्थी [illegible]

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलतांना महाविद्यालयाचे प्राचार्य सौ. जी. पाटील यांनी महाविद्यालयाच्या चौफेर प्रगतीचा आढावा घेतला व वैद्यकीय, अभियांत्रिकी खेरीज जीवनात इतर असंख्य क्षेत्रे आहेत, त्यात झोकून देऊन काम करण्याची गरज आहे असे सांगितले.

यानंतर रत्नाकर मतकरी यांनी 'अधिकात अधिक भरे' या अरूंधती रॉय यांच्या नर्मदा बचाव आंदोलना संबंधीच्या प्रदीर्घ लेखाचे खुमासदार शैलीत वाचन केले. त्यानंतर प्रेक्षकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांना उत्तरे

देताना प्रा.श्री. संजय मंगला गोपाळ यांनी भारतातील सर्वात मोठ्या प्रकल्पाच्या फायद्या तोट्यांचे मार्मिक मूल्य-मापन केले. विद्यार्थ्यांकडून देखील या कार्यक्रमास प्रचंड प्रतिसाद मिळाला.

सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन व पाहुण्यांचा परिचय विजय माने याने करुन दिला तर आभार कु. मंजुषा वाळिंबे हिने व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कु. यतिन ओक, जयेश म्हात्रे, मानसी गलगली, पूनम गोरे व सारिका सतेगीरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

**विद्या प्रसारक मंडळ**

२५ जुलै १९९९ रोजी विद्या प्रसारक मंडळाची वार्षिक सर्व साधारण सभा डॉ बेडेकर विद्या मंदिरातील विद्यालंकार सभागृहात झाली. त्या सभेत खालील पदाधिकारी व सदस्यांची १९९९-२००० च्या कार्यकारिणी करिता निवड करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | डॉ. वा. ना. बेडेकर |
| उपाध्यक्ष | - | श्री. श्री.वि. करंदीकर |
| कार्याध्यक्ष | - | श्री. अ.धो. टिल्लू |
| कोषाध्यक्ष | - | श्री. मा.य. गोखले |
| कार्यवाह | - | श्री. अ.भा. जोशी |

**कार्यकारिणी सदस्य**

| | |
|---|---|
| श्री. द.बा. खर्डे | श्री. मा.ना. पाटील |
| श्री. वि.ना. मराठे | श्री. दि.गु. जोशी |
| श्री. ल.ग. देव | डॉ. अ.ना. बापट |



**कार्यकारिणी मंडळ - विद्या प्रसारक मंडळ (१९९९ - २०००)**

बसलेले (डावीकडून) - श्री. ल.ग. देव, श्री. मा.य. गोखले (कोषाध्यक्ष), श्री. अ.धों. टिल्लू (कार्याध्यक्ष), डॉ. वा.ना. बेडेकर (अध्यक्ष), श्री. श्री.वि. करंदीकर(उपाध्यक्ष), श्री. अ.भा. जोशी (कार्यवाह)

उभे (डावीकडून) - श्री. द.बा. खर्डे,श्री. मा.ना. पाटील, श्री. वि.ना. मराठे,श्री. दि.गु. जोशी, श्री. ल.ग. देव, डॉ. अ.ना. बापट

---

देशाने आपल्याला काय दिलं यापेक्षा आपण देशासाठी काय केलं याचा विचार करा.